CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३१५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भारताला मिळणार पहिले स्वदेशी हेलिकॉप्टर; सिव्हिल डिफेन्स एव्हिएशनमध्ये क्रांती!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतात नवीन प्रोडक्शन लाईन मिळाल्यानंतर आता एव्हिएशन जगतातील मोठी कंपनी एअरबस उत्तुंग भरारी घेण्याची शक्यता आहे. एअरबस कंपनीला भारतातील देशांतर्गत कनेक्टिव्हिटी क्षेत्रात १ हजारपेक्षा जास्त हेलिकॉप्टर विकले जाण्याची शक्यता आहे. याचबरोबर लष्करी दले देखील आपल्या गरजेनुसार त्यांच्याकडून हेलिकॉप्टरची मागणी करू शकतात.

इकॉनॉमिक टाईम्सला दिलेल्या मुलाखतीत एअरबस हेलिकॉप्टरचे सीईओ ब्रुनो इवेन यांनी सांगितलं की, नवीन असेंबली लाईनमधून पहिले हेलिकॉप्टर हे २०२७ च्या सुरूवातीला तयार होऊन बाहेर पडण्याची शक्यता आहे. एअरबस भारतीय कंपनी टाटासोबत मिळून भारतात हेलिकॉप्टर निर्मिती करत आहे.

**भारतातून लष्करी हेलिकॉप्टर निर्यात**

एअरबसच्या सीईओंनी सांगितलं की, 'आम्ही आमचं टार्गेट हे नागरी आणि लष्करी मार्केट डोळ्यासमोर ठेवून तयार केलं आहे. जर लष्करी मिशनसाठी जर क १२५ हेलिकॉप्टर निवडण्यात जास्त रस दाखवत आहेत. ते हे हेलिकॉप्टर खरेदी करू इच्छितात. त्यामुळं हे हेलिकॉप्टर आम्ही आमच्या ग्राहकांसाठी भारतात तयार न करण्याचं कोणतंच कारण नाही.

**नव्या असेंबली लाईनसाठी १००० कोटीची गुंतवणूक**

एअरबसच्या सीईओंनी सांगितलं की पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युअल मॅक्रोन यांच्याकडून बंगळुरूमधील एक नवीन एअरबस आणि टाटा ॲडव्हान्स सिस्टम लिमिटेड प्रोडक्शन फॅसिलीटीचे मुंबईतून व्हर्चुअली उद्घाटन करण्यात आलं. या असेंबली लाईनसाठी एअरबसनं जवळपास १००० कोटी रूपये गुंतवणूक केली आहे.



## थोडक्यात...

### पुण्यातील सोसायटीत खेळणाऱ्या मुलावर ३ ते ४ कुत्र्यांची झडप

**पुणे :** पुण्यात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला असून किरकटवाडी परिसरातील चैत्रांगण सोसायटीत एका लहान मुलावर भटक्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोसायटीच्या आवारात खेळत असलेल्या चिमुरड्याकडे अचानक ३-४ भटके कुत्रे धावत आले. त्यानंतर त्यांनी काही क्षणांत मुलावर झडप घालत चावा घेण्याचा प्रयत्न केला. घाबरलेल्या मुलाने आरडाओरड केल्यावर आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेत त्याला वाचवले. सुदैवाने मुलगा किरकोळ जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

### आसिम मुनीर माझे बॉस नाहीत!; पाक संरक्षण मंत्र्यांचे खळबळजनक विधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पाकिस्तानमध्ये सरकार लष्कराच्या इशाऱ्यावर चालते, ही चर्चा जगजाहीर आहे. मात्र, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी या वादात उडी घेत लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांच्याशी असलेल्या संबंधांवर मोठे विधान केले आहे. जनरल आसिम मुनीर हे माझे बॉस नाहीत, माझे बॉस केवळ पंतप्रधान शहबाज शरीफ आहेत, असे ख्वाजा आसिफ यांनी स्पष्ट केले आहे. एका आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीनंतर पाकिस्तानच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

### मातीची भांडी बनवणाऱ्याला १ कोटींची जीएसटी नोटीस

**रायबरेली :** उत्तर प्रदेशातील रायबरेलीमध्ये प्रशासकीय निष्काळजीपणाचं एक अत्यंत धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. मातीची भांडी बनवणाऱ्या मोहम्मद शाहिद यांना चक्क १ कोटी २५ हजार २९७ रुपयांची जीएसटी (ऋढढ) नोटीस पाठवण्यात आली आहे. ही नोटीस मिळाल्यापासून त्यांच्या कुटुंबात भीतीचं वातावरण पसरलं आहे. शाहिद यांना ही नोटीस मिळाली असून ते प्रचंड घाबरलेले आहेत. त्यांनी आता वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे धाव घेत या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. मोहम्मद शाहिद यांना मिळालेल्या नोटिसीनुसार, त्यांची वार्षिक उलाढाल दाखवण्यात आली आहे, जी प्रत्यक्षात शून्य आहे. त्यांचं आणि त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अत्यंत तुटपुंज्या उत्पन्नावर चालतो. हे फसवणुकीचं प्रकरण असल्याचं मानलं जात आहे.

### शिलांगचे खासदार फुटबॉल खेळताना अचानक कोसळले आणि हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचं निधन

**शिलाँग:** मेघालयची राजधानी शिलाँग येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. खासदार रिकी ए. जे. सिंगकोन यांचं फुटबॉल खेळताना अचानक निधन झालं. वयाच्या अवघ्या ५४व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली आणि संपूर्ण राज्यात शोककळा पसरली.



मावलाई मावियोंग परिसरात मित्रांसोबत एक फ्रेंडली फुटबॉल सामना खेळत असताना सिंगकोन अचानक मैदानावर कोसळले. उपस्थितांनी तात्काळ त्यांना मावियोंग कम्युनिटी हेल्थ सेंटरमध्ये दाखल केलं. मात्र तिथे डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे पुढील उपचारांसाठी त्यांना डॉ एच गॉर्डन रॉबर्ट्स हॉस्पिटल येथे हलवण्यात आलं. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, पण त्यांचा जीव वाचवता आला नाही. सिंगकोन हे व्हॉइस ऑफ द पीपल पार्टीचे प्रमुख नेते होते. त्यांच्या अचानक जाण्याने राजकीय वर्तुळातही मोठी खळबळ उडाली आहे.

# भिवंडीत सत्तापालट!

## भाजपचे बंडखोर नारायण चौधरी नवे महापौर; काँग्रेसने फिरवला गेम

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २० फेब्रुवारी :** भिवंडीच्या राजकारणात आज अक्षरशः भूकंप झाला आहे. भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीत भाजपची समीकरणं कोलमडली आहेत. भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक नारायण चौधरी यांनी पक्षाविरोधात बंड करत काँग्रेसप्रणीत 'सेक्युलर फ्रंट'च्या मदतीने महापौरपद मिळवलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेलं अंतर्गत राजकारण अखेर उघडपणे समोर आलं आहे. भाजपने ऐनवेळी चौधरी यांचं नाव बाजूला करुन स्नेहा पाटील यांना अधिकृत उमेदवारी दिली होती. हा निर्णय चौधरींना मान्य नव्हता. नाराजी इतकी वाढली की त्यांनी आपल्या ७-८ समर्थक नगरसेवकांसह वेगळा गट तयार केला आणि थेट काँग्रेससोबत हातमिळवणी केली.

या खेळीमुळे भाजपच्याच रणनीतीचा फटका भाजपला बसला आहे.




महापालिकेतील आकडेमोड पाहिली, तर काँग्रेसकडे सर्वाधिक जागा आहेत, तर भाजप दुसऱ्या क्रमांकावर आहे. राष्ट्रवादी (शरद पवार गट), शिवसेना (शिंदे गट), समाजवादी पक्ष आणि स्थानिक आघाड्यांचे नगरसेवक अशी विभागलेली ताकद असताना, काँग्रेसने भाजपच्या बंडखोरांना सोबत घेत 'सेक्युलर फ्रंट' उभा केला आणि सत्तेची चावी आपल्या हातात घेतली.

**भिवंडी महानगरपालिकेतील संख्याबळ**

काँग्रेस : ३०
भाजपा : २२
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार): १२
शिवसेना (शिंदे गट):१२
समाजवादी पक्ष :०६
कोणार्क विकास आघाडी : ०५
भिवंडी विकास आघाडी : ०३
अपक्ष : १

# अजित पवार यांच्या विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल नऊ दिवसांत येणार



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथे झालेल्या विमान अपघाताच्या तपासाला गती आली आहे. लिअरजेट ४५ (व्हीटी एसएसके) विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल ३० दिवसांच्या आत प्रसिद्ध केला जाईल, अशी माहिती केंद्र सरकारच्या नागरी उड्डयन मंत्रालयाने गुरुवारी दिली आहे. हा तपास तांत्रिक आणि पुराव्यांच्या आधारे केला जात असून आंतरराष्ट्रीय मानकांनुसार (आयसीएओ) २८ फेब्रुवारीपर्यंत प्राथमिक अहवाल जाहीर केला जाण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे.

नागरी उड्डाण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार विमानात बसवलेल्या दोन फ्लाईट रेकॉर्डर्सपैकी डिजिटल फ्लाईट डेटा रेकॉर्डर (डीएफडीआर) मधील माहिती मिळवण्यात यश आले आहे. मात्र कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डरला (सीव्हीआर) आगीमुळे तांत्रिक बिघाडामुळे त्यातील डेटा मिळवण्यासाठी मूळ उत्पादक कंपनी आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची मदत घेतली जात आहे. विमानाच्या अवशेषांची प्रयोगशाळेत चाचणी आणि देखभाल रेकॉर्डची तपासणी सध्या सुरू आहे. अपघातानंतर सरकारने व्हीएसआर व्हेंचर्स या ऑपरेटर कंपनीच्या कामकाजाचे विशेष ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. ४ फेब्रुवारीपासून सुरू झालेले हे ऑडिट आता अंतिम टप्प्यात असून यामध्ये सुरक्षितता मानके, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि देखभाल पद्धतींची कसून तपासणी केली जात आहे. या ऑडिटच्या अहवालानंतर दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्याचे संकेतही मंत्रालयाने दिले आहेत.

# यूपीआय पेमेंटला बायोमेट्रिक पासवर्ड

## लहान व्यवहारांसाठी चेहरा, बोटांच्या ठशांचाही पर्याय

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २० फेब्रुवारी :** युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) द्वारे लहान मूल्यांचे व्यवहार करताना आता पिन क्रमांक टाकण्याची गरज नाही. वापरकर्त्यांचा चेहरा अथवा बोटांच्या ठशांच्या आधारे देखील व्यवहार पूर्ण होतील.

फोन पे या फिनटेक कंपनीने आपल्या नवीन पद्धतीची गुरुवारी घोषणा केली. त्यामुळे पाच हजार रुपयांपर्यंतच्या व्यवहारांसाठी आता पिन क्रमांक टाकण्याची आवश्यकता नाही. मात्र, त्याहून अधिक किमतीचे व्यवहार करण्यासाठी पूर्वीप्रमाणेच पिन क्रमांक टाकावा लागेल. एखाद्या मित्राला अथवा कुटुंबातील सदस्यांना पैसे पाठविण्यासाठी, क्यूआर कोड स्कॅन करून खरेदीसाठी,




ऑनलाइन व्यवहारांसाठी अथवा बँक खात्यातील शिल्लक रक्कम पाहण्यासाठी देखील बोटाचे ठसे अथवा फेसरीडिंग सुविधेचा वापर करता येणार आहे.

अनेकदा गर्दीच्या ठिकाणी पिन क्रमांक टाकणे गैरसोयीचे होते. आपल्या पिन क्रमांकाची गोपनीयता धोक्यात येऊ शकते. अशावेळी बोटाच्या ठशांचा वापर करणे सोयीचे होणार आहे. ग्राहकांना ऑनलाइन व्यवहार करणे सोयीचे जावे आणि त्यांचा गोपनीय क्रमांक सुरक्षित राहावा, यासाठी ही सुविधा देऊ करण्यात आल्याची माहिती फोन पेच्या वतीने देण्यात आली. जर, बोटांचे ठसे कोणत्याही कारणामुळे स्वीकारले जात नसतील, प्रणालीमध्ये काही अडथळे असतील तर लगेच ग्राहक पिन क्रमांकाच्या पर्यायाचा वापर करू शकणार आहेत.

बायोमेट्रिक पद्धतीने फोन पे पवर गेल्यानंतर प्रोफाइलमध्ये गेल्यावर 'मॅनेज पेमेंट' या पर्यायावर क्लिक करावे. त्यानंतर 'बायमेट्रिक पे'साठी दोन पर्याय येतात. त्यात चेहरा आणि बोटांच्या ठशांचा पर्याय आहे. दोन्ही पर्यायांवर गेल्यानंतर वापरकर्त्यांच्या चेहऱ्याचे आणि बोटाच्या शांचे स्कॅन झाल्यानंतर ही सेवा सुरू होते. वापरकर्त्यांनी फोन पे ॲप अपडेट असल्याची खात्री करावी. त्यानंतरच नवीन पर्याय संबंधितांना दिसतील.

# अरबी समुद्रात शिवस्मारक होईल, असे वाटत नाही : संभाजीराजे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होईल, असे मला वाटत नाही, असे माजी खासदार संभाजीराजे यांनी म्हटले आहे. ते व्हावे यासाठी मोठे आंदोलन केले. मात्र परवानग्यांचे दाखले देत पुढे काहीच होत नाही, असे म्हणत त्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच महाराष्ट्रातील किल्ले संवर्धनासाठी ज्या प्रमाणात मदत अपेक्षित आहे, त्या प्रमाणात सरकारची मदत होत नाही, असेही ते म्हणाले.



रायगड विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून दुर्गराज रायगडाचे संवर्धन आणि विकासकामे सुरू आहेत. या कामांमध्ये सरकारची मदत होत आहे, मात्र ज्या प्रमाणात मदत अपेक्षित आहे तशी होत नाही. १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून जाहीर करण्यात आले. त्यापैकी केवळ रायगड किल्ल्यावर काम सुरू आहे. जलदुर्गांसह इतरही किल्ल्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे, असे छत्रपती संभाजीराजे यावेळी म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सवाच्या कार्यक्रमासाठी संभाजीराजे दिल्लीत होते. यादरम्यान ते म्हणाले की, राज्यात आणि केंद्रात एकाच पक्षाचे सरकार आहे. तरीही परवानग्या मिळत नाहीत, ही सबब दिली जाते. त्यामुळे सरकारने हे स्मारक होणार की नाही याबद्दल एकदाच काय ते स्पष्टपणे सांगावे.

# 'एमपीएससी'च्या राज्यसेवा २०२६ मध्ये ४८४ जागांची वाढ होणार !

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २० फेब्रुवारी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित, गट-अ आणि गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ या परीक्षेसाठी अर्ज करण्यास उमेदवारांना ३१ डिसेंबर ते २० जानेवारीपर्यंत वेळ देण्यात आली होती. विशेष म्हणजे जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर अनेक विभागाकडून एमपीएससीकडे मागणीपत्र आलेले नव्हते. त्यामुळे केवळ ८७ जागांसाठी ही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, या जागांमध्ये मोठी वाढ होणार असल्याची अपेक्षा उमेदवारांना असली तरी अजूनही यासंदर्भात निर्णय झालेला नाही. यावर आता नवीन माहिती समोर आली आहे. खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून कठोर शब्दात याबद्दल मागणी केली आहे. त्यामुळे पूर्व परीक्षेच्या आधी जागांमध्ये वाढ होण्याची दाट शक्यता आहे. राजेनिंबाळकर काय म्हणाले पाहूया.



'एमपीएससी'ने परीक्षेसंदर्भातील माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. या पदभरतीच्या माध्यमातून सामान्य प्रशासन विभाग, महसूल आणि वन विभागातील एकूण एकूण ८७ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. त्यात उप मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) गट-अ पदाच्या १३ जागा, सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ पदाच्या ३२ जागा, सहायक गट विकास अधिकारी गट-ब पदाच्या ३० जागा, उद्योग अधिकारी (तांत्रिक) गट-ब पदाच्या ४ जागा आणि पशुवैद्यकीय अधिकारी गट-अ पदाच्या ८ जागांचा समावेश आहे. तर उपजिल्हाधिकारी गट- अ या संवर्गासाठी शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झालेले नाही.

### या जागाही वाढण्याची शक्यता

- ग्रामविकास विभाग - ४३
- वित्त विभाग - ३२
- उद्योग, उर्जा व कामकार विभाग - ०४
- गृह विभाग - ०९

### मुख्यमंत्र्यांच्या पत्रात काय म्हणाले?

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षा-२०२६ ही ३१ मे २०२६ रोजी नियोजित आहे. जर या परीक्षेपूर्वी ४८४ जागांना मान्यता मिळून त्यांचा जाहिरातीत समावेश झाला नाही, तर हा सलग तिसऱ्या वर्षाचा खंड असेल. शेवटची जाहिरात २०२४ मध्ये आली होती. यामुळे शेतकरी कुटूंबातील अनेक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची वयोमर्यादा संपून त्यांचे आयुष्यभराचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या ४८४ पदांच्या मागणीपत्राला वित्त विभागाने तातडीने मान्यता द्यावी, अशी मागणी खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी केली आहे.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## दैठणा येथे शिवजयंती उत्साहात साजरी



**शिरूर अनंतपाळ :** दैठणा येथील चावडी या गावच्या मध्यवर्ती ठिकाणी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमासाठी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

याप्रसंगी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व्यंकटराव बिरादार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच दैठणा ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच आशिष गोविंदराव बिरादार, बालाजी तोटे, माधवराव पाटील, नितीन पाटील, निळकंठ बिरादार आदी मान्यवर उपस्थित होते.दैठणा गावचे समाजसेवक म्हणून ओळखले जाणारे सुखदेव किशनराव पाटील आणि सचिन पाटील यांनीही कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती लावली.

कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी शिवाजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करून त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचे आवाहन केले. संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते.

## दैठणा येथील बौद्ध वाड्यात शिवजयंती उत्साहात साजरी



**शिरूर अनंतपाळ :**दैठणा येथील बौद्ध वाड्यात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी दैठणा येथील विद्यमान सरपंच शेषराव कांबळे यांच्यासह विलास कांबळे, रमेश कांबळे, बाबुराव टिपराळे, व्यंकट कदम, जीवन कांबळे, भागवत कांबळे, पंढरी कांबळे, भीमराव कांबळे, श्रीपती कांबळे आदींनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमात शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि आदर्शांचा गौरव करण्यात आला. युवकांनी देशभक्तीपर घोषणांनी परिसर दणाणून सोडला. तसेच बालकांनी व महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे आयोजन बौद्ध वाड्यातील युवक मंडळाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विलास कांबळे यांच्याकडून सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## शास्त्री विद्यालयात शिवजयंती साजरी



**उदगीर:** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात शिवजयंती संपन्न झाली. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष कृष्णा मारावार प्रमुख पाहुण्या आशा मोरे पर्यवेक्षक किरण नेमट माधव मठवाले कार्यक्रम प्रमुख विश्र्वजीत श्रीखंडे उपस्थित होते.

यावेळी कल्याणी महामुनी हीने शिवरायांवर भाषण केले तर प्रमुख पाहुण्या आशा मोरे यांनी आदर्श राज्यकर्ता मुत्सद्दी व कर्तुत्ववान राजा हे शिवरायांचे गुणवैशिष्ट्ये आपल्या भाषणात विशद केले. अध्यक्ष समारोपात कृष्णा मारावार यांनी शिवरायांच्या विलक्षण व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय शिवशट्टे प्रास्ताविक विश्र्वजीत श्रीखंडे स्वागत व परिचय मनीषा आचार्य तर आभार मच्छिंद्र सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता प्रीती शेंडे यांच्या कल्याणमंत्रानी झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे सहप्रमुख निलेश मांडवकर यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## माध्यमिक आश्रम शाळेत दहावी परीक्षा शांततेत

**रेणापूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने २० फेब्रुवारी पासून दहावीची परीक्षांना सुरुवात झाली. त्या अनुषंगाने माध्यमिक आश्रम शाळा रूपचंद नगर येथील परीक्षा केंद्रावर शांततेत सुरळीत सुरुवात झाली. या परीक्षा केंद्रावर एकूण २९६ विद्यार्थी परीक्षेला बसले विद्यार्थ्यांनी वेळेआधीच उपस्थिती नोंदवली. परीक्षा केंद्रावर आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या

परीक्षेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी परीक्षा केंद्र परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.त्यामुळे संपूर्ण परीक्षा कालावधीत शांततेत सुरुवात झाली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शिस्तबद्ध वातावरण राखण्यासाठी परीक्षा केंद्र परिसरात योग्य नियोजन करण्यात आले.

परीक्षार्थी व पालकांनी शाळा प्रशासनाच्या व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले.

एकूणच माध्यमिक आश्रम शाळा, रूपचंद नगर येथील परीक्षा केंद्रावर दहावी व बारावीच्या परीक्षा यशस्वीरीत्या व शांततेत सुरु असल्याची माहिती प्राचार्य प्रदीप राठोड तसेच परीक्षा केंद्र प्रमुख वडवले यांनी दिली.

# ‘डीजे’च्या आवाजापेक्षा ‘पाण्याचा’ आवाज महत्त्वाचा

### शिऊर येथील शिवप्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम!, शिवजयंतीनिमित्त मिरवणुकीला फाटा; मंडळाने गावाला दिली विंधन विहिरीची भेट..

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**
**वलांडी, दि. २० फेब्रुवारी :** दरवर्षी शिवजयंती म्हटली की गुलालाची उधळण, कानठळ्या बसवणारा डीजेचा आवाज आणि भव्य मिरवणूक हे समीकरण ठरलेले असते. मात्र, या परंपरेला फाटा देत येथील ‘देवणी तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या निलंगा तालुक्यातील शिऊर येथील शिवप्रतिष्ठान नव तरुण मंडळाने’ यंदा एक वेगळाच आदर्श समाजासमोर ठेवला आहे. मिरवणुकीवर होणारा लाखो रुपयांचा खर्च टाळून मंडळाने गावात पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहीर (बोअरवेल) खोदून गावाची तहान भागवण्याचा संकल्प पूर्ण केला आहे.



शिवजयंतीच्या या अनोख्या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत असून, अशीच साजरी व्हावी शिवजयंती अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

**बडेजाव टाळून समाजहिताला प्राधान्य**

वाढत्या उन्हाळ्यामुळे गावात पाणीटंचाईची समस्या निर्माण होऊ लागली होती. दरवर्षी मंडळाच्या वतीने मिरवणुकीवर मोठा खर्च केला जायचा. मात्र, यंदा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत ‘डीजे’च्या तालावर नाचण्यापेक्षा ग्रामस्थांच्या डोळ्यांतील पाणी पुसण्याचा निर्णय घेतला. शिवजयंती उत्सवाचा निधी गोळा करून गावात एका मोक्याच्या ठिकाणी विंधन विहीर खोदण्यात आली. या विंधन विहीरीचे भूमिपूजन सैन्य दलातील सेवानिवृत्त कर्नल सचिन रंडाळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. विशेष म्हणजे, या विहिरीला भरपूर पाणी लागल्याने ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

**ठळक वैशिष्ट्ये**

- खर्चाला फाटा: मिरवणूक आणि अवाजवी सजावटीचा खर्च वाचवला.
- कायमस्वरूपी सुविधा: केवळ एक दिवसाचा उत्सव न करता गावाला कायमस्वरूपी पाण्याची सोय करून दिली.
- प्रदूषणमुक्त साजरीकरण: ध्वनी आणि वायू प्रदूषणाला पूर्णपणे फाटा दिला.
- युवाशक्तीचा आदर्श: तरुणांनी एकत्र येत सामाजिक बांधिलकी जपली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे हित जपले, तोच वारसा पुढे नेण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. केवळ घोषणा देण्यापेक्षा महाराजांच्या विचारांप्रमाणे कृती करणे जास्त महत्त्वाचे वाटले.

**– अध्यक्ष, शिवप्रतिष्ठान नव तरुण मंडळ**

## म.फुले विद्यालयाची शिवजयंती निमित्त ऐतिहासिक मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि. २० फेब्रुवारी :** अहमदपूर येथील महात्मा फुले प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने शिवजयंती महोत्सव २०२६ अभूतपूर्व उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. किसान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित या विद्यालयाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यविचारांचा जागर घालत संपूर्ण शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. माधवराव पाटील उपस्थित होते, तर उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी सहाय्यक पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, नगराध्यक्ष स्वप्नील व्हत्ते, माजी सभापती आयोध्या ताई केंद्रे, माजी नगराध्यक्ष ड. भारत चामे, शिवानंद हेंगणे, माजी आमदार बब्रुवान खंदारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर काढण्यात आलेली भव्य मिरवणूक अहमदपूरच्या रस्त्यांवरून दिमाखात फिरली. ढोल-ताशांच्या गजरात, लेझीम आणि झांज पथकांच्या तालावर विद्यार्थी जोशात नाचत होते. वारकरी पथकाचा पारंपरिक पोवाडा वातावरण भारावून टाकणारा ठरला.



शिवरायांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी साकारलेले प्रसंग, जिजामाता रथ, तसेच घोड्यावर विराजमान शिवाजी महाराजांची प्रतिकृती हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले. छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

शिवजयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. आले मराठे, ललाटी भंडार आणि माय भवानी या देशभक्तीपर गीतांवरील विद्यार्थ्यांचे नृत्य सादरीकरण टाळ्यांच्या कडकडाटात दाद मिळवून गेले. शिवरायांच्या पराक्रमावर आधारित नाटिका, प्रभावी वक्तृत्व आणि समूहगीतांनी कार्यक्रमाला वैचारिक उंची दिली.

डी.जे. सादरीकरणांमध्ये आपली संस्कृती: आपला अभिमान, हास्य कल्लोळ - कॉमेडी डान्स, रणरागिणी: शिवशाही ते आजची नारी, बाबूराव स्टाईल: फिर हेरा फेरी, ढोल-नगाडा व दांडिया फ्यूजन, भीमशक्ती: क्रांतीचा हुंकार आणि लय-ताल: सुरांचा साज या विविध थीम्स सादर करण्यात आल्या. पारंपरिक आणि आधुनिक कलांचा संगम पाहून उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २० फेब्रुवारी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन श्रीकृष्ण लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी शाळेचा विद्यार्थी सिद्धांत आलमले याने शिवाजी महाराज यांच्याविषयी माहिती सांगितली. भारतातील सर्वात शूर राजांपैकी एक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. ‘शिवजयंती’ अर्थात छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव महाराष्ट्रात एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरा केला जातो. महाराजांची स्वराज्य स्थापना, सामान्य जनते विषयी असलेले प्रेम, सर्व धर्मांचा आदर या विषयी माहिती दिली. शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्तानें शाळेचे विद्यार्थी रियांश कदम, रियांश कांबळे, सिद्धांत पाटील, स्मयन कुलकर्णी, वरद रेकुलवाड, शिवांश स्वामी, निरंजन बस्तापुरे, कृष्णा माळी, अभय फड, प्रतिक मोरे, ऋषिकेश निले, ओम वाघमारे यांनी शिवाजी महाराज यांची वेशभूषा साकारून त्यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

## युवकानी स्वत:ची क्षमता ओळखायला शिकले पाहिजे : डॉ. भागवत केंद्रे

### वीरशैव तेली समाजाच्यावतीने श्री सिद्धेश्वरास गंगाजल अभिषेक



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि. २० फेब्रुवारी :** स्नेहस्मेलनाच्या व्यसपीठावरून तरुण युवा पिढीनी आपल्या कला अविष्कार घडवून करिअर करावेत आशा संधी पुन्हा कुठेच मिळत नाही.ज्याच्याकडे स्किल आहे. तोच विद्यार्थी मार्केटमध्ये टिकणार आहे. प्रत्येक गोष्टीची माहिती महाविद्यलयातून मिळत असते. युवकामध्ये आत्मनिर्भर आणि क्षमता निर्मान करण्याचे काम महाविद्यालयीन स्तरावरून होत असते . म्हणून प्रत्येक विद्यार्थीनी पुढे येऊन सहभाग नोंदविला पाहिजे. मित्रानो प्रयत्न करायला शिका, प्रयत्नवादी व्हा प्रयत्ना अंती यश मिळविता येते. या युवारंग २०२६ स्नेहस्मेलनात ज्यांनी सहभाग नोंदविला आणि यश संपादन केले आहे आशा सर्व युवक युवतीचे अभिनंदन आणि ज्यांनी शेवटपर्यंत झुंझ दिली प्रयत्न केले . आशा सर्व विद्यार्थी मित्रानाही सुभेच्छा देत त्याच्या प्रयत्नाचे भरभरून कौतूक केले ते संभाजीराव केंद्रे महाविदयालय जळकोट येथे युवारंग २०२६ स्नेहस्मेलनाच्या समारोप प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

या प्रसंगी व्यासपीठावर कार्यकमाचे अध्यक्ष डॉ भागवत केंद्रे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संस्थेच्या कोषाध्यक्ष प्रा डॉ शितल गुट्टे ताई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.टी .लहाने , विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ विजयकुमार कल्लूरकर , संस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ प्रशांत कांबळे, डॉ नवनाथ मुसळे, डॉ कल्पना केंद्रे, विद्यार्थी संसद सचिव गणेश लिंगदळे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

या प्रसंगी पुढे बोलतान डॉ भागवत केंद्रे म्हणाले हार आणि जित जीवणाचे अविभाज्य भाग आहे. अपयश हि यथाची पहिली पायरी आहे. अपयशा नंतर यश निश्र्चित आहे. त्यांना सक्षमपणे सामोर्य गेले पाहिजे असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी लावणी कला प्रकारात शिवानी मठपती प्रथमधनश्री गडकर व्दितीयविडंबन कला प्रकारात शेख मुस्कान, नामवाड पंकज प्रतिक्षा शिदे, सचिन कंठाळे शिल्पा चमरगौर संजीवनी मठपती कोळी नृत्य प्रकारात प्रणाली तोरमवाड प्रथम आनंदनगरी समिक्षा इबिददार प्रथम वेदांत माने व्दितीय क्रमांक पटकावले आहे. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनिषा देशपांडे व प्रा आरती सुरपाम यांनी केले तर आभार प्रा सोनाबाई पाटील मॅडम यांनी मानले .

## राज्यस्तरीय स्पर्धेत डी.बी. फार्मसीची दमदार झेप; ‘स्टराईल प्रॉडक्ट्स’ मॉडेलला प्रथम क्रमांकाचा मान

### एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात १० हजारांच्या रोख बक्षिसासह विद्यार्थ्यांचा दैदिप्यमान विजय

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि. २० फेब्रुवारी :** चाकूर तालुक्यातील महाळंग्रा येथील डि.बी.फॉर्मसीला स्टराईल प्रॉडक्ट्स’ मॉडेलला प्रथम क्रमांकाचा मान मिळाला आहे.सोलापूर येथील एमआयटी विश्र्वप्रयाग विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फार्मसीत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय ‘मॉडेल मेकिंग’ स्पर्धेत डी.बी. कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्चच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी ‘लेआऊट ऑफ स्टराईल प्रॉडक्ट्स’ हा विषय



निवडून मॉडेल सादर केले. औषधनिर्मिती क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या या विषयावर प्रभावी मांडणी करत त्यांनी परीक्षकांची दाद मिळवली. प्रत्येक टीममध्ये दोन विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्रथम वर्षातील डी.फार्मसीचे विद्यार्थी डोंगरे शीतल, जाधव प्रतीक यांनी सादर केलेल्या मॉडेलला प्रथम क्रमांक मिळाला असून त्यांना रुपये १०,०००/- चे रोख बक्षीस प्रदान करण्यात आले.

याशिवाय ‘बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट’ या विषयावर रियान शेख व आकाश पोळकर यांनी मॉडेल सादर केले. ‘मटेरिओव्हिजीलन्स’ या विषयावर माया चाडेबोणे व अनुश्री नागरगोजे यांनी पोस्टर सादर केले. तसेच ‘डिझास्टर मॅनेजमेंटमध्ये फार्मासिस्टची भूमिका’ या विषयावर कृष्णा कदम व गणेश राजमाने यांनी पोस्टर सादर करत सहभाग नोंदवला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशासाठी प्रा. वैष्णवी ताथोडे, प्रा. आशा केदार, प्रा.मोनिका इंगळे, प्रा. मानसी देशमुख, प्रा. दिपाली भुरे, प्रा. रोहित पांचाळ, प्रा. सुप्रिया काटगाव, प्रा.योगिता राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल राधेय चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष दिनेश बेंबडे, सचिव सौ. प्रणिता बेंबडे, कार्याध्यक्ष विवेक बेंबडे, विश्र्वस्त स्नेहा बेंबडे, संचालक डॉ. श्रीकांत ढगे, प्राचार्य डॉ. जयदीप यादव, प्राचार्य शशिकांत चिल्लरगे, प्रशासकीय अधिकारी श्रीहरी वेदपाठक तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेत ढाल विजेता गोदावरी देवी लाहोटी कन्या विद्यालयाचा संघ तर उपविजेता ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र विद्यालयाचा संघ

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २० फेब्रुवारी :** मराठवाड्यातील सुप्रसिद्ध व ऐतिहासिक स्वर्गीय लाल बहादूर शास्त्री यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे ४६ वे वर्ष आहे. एकूण ४५ संघातील ९० स्पर्धकांनी सहभाग घेतला दोन दिवस चालणाऱ्या स्पर्धेचा समारोप बक्षीस वितरणांनी झाला.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्रजी अलुरकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे गजानन भातलवंडे, नरेंद्र मेडेवार राजकुमार मस्के ,मधुकरराव वट्टमवार, शंकरराव लासुणे,शिवाजी बिराजदार, मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर अंकुश मिरगुडे हे उपस्थित होते.

परीक्षक नयन राजमाने व बालाजी भंडारे यांनी परीक्षक मनोगतातून वक्तृत्व कसे असावे नवीन नवीन गोष्टी आत्मसात करून जबाबदारी पार पाडत जाणे, अनुभव घेणे अशा गोष्टी अशा स्पर्धेतून प्राप्त होत असतात. अपयश पचवण्याची तयारी असावी. स्पर्धा जरूर असावी, पण त्यात संवेदना असावी. विचार मांडले.

प्रमुख पाहुणे गजानन भातलवंडे यांनी अशा स्पर्धेतून नवीन अनुभव मिळतात संगत चांगली करा चांगल्या लोकांच्या सहवासात रहा नेहमी प्रयत्न करा यश नक्कीच मिळेल.

नरेंद्र मेडेवार यांनी वक्तृत्व ही कला आहे मोठी माणसे वक्तृत्वामुळे अधिक मोठी होतात असे विचार मांडले .राजकुमार मस्के यांनी वादाला विवादाची विवादाला वादाची जोड मिळाली की आयुष्य सुंदर होते यशवंत विद्यार्थ्यांचे कौतुक होते. अपयशही पचवता आलं पाहिजे विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील असावं असं वक्तव्य केलं.

अध्यक्षीय समारोपात डॉ. सुरेंद्र आलूरकर यांनी जिंकण्याच्या ईर्षेनेच स्पर्धेत सहभागी व्हावे आपले मत आपले विचार आपल्याला ठामपणे मांडता आले पाहिजे तुमचं भवितव्य तुम्हीच ठरवणार आहात म्हणून चांगली संगत,प्रामाणिकपणा सतत कष्ट करण्याची तयारी ठेवा असे विचार मांडले.

या मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस ढाल आणि १०हजार रुपये पारितोषिकाचे मानकरी ठरला आहे गोदावरी देवी लाहोटी कन्या विद्यालय लातूरचा संघ तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस ७००० रुपये पारितोषकाचे मानकरी ठरले आहे लातूर येथील ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र विद्यालयाचा संघ उपविजेता ठरला आहे.तृतीय शाहू विद्यालय शेळगाव, सर्व चतुर्थ संघ लालबहादूर शास्त्री विद्यालय उदगीर सर्वपंचम संघ संभाजीराव बडगीर माध्यमिक विद्यालय ममदापूर हे मानकरी ठरले आहेत.

ग्रामीण मुलीत प्रथम गायत्री अदनाक द्वितीय आरती मोकळे, तृतीय सायली पाडोळे , चौथी अक्षरा इप्पर पाचवी प्रज्ञा घोडके ग्रामीण मुलात प्रथम अभिलाष निरगुडे द्वितीय शुभम



देवनाळे तृतीय शिवशंकर कदम चौथा निशांत तांबे पाचवा संकेत कदम शहरी मुलीत प्रथम वैदेही पाटील द्वितीय रजनी कलमुरे तृतीय प्रियंका मुंढे चौथी श्रेयणी चिद्रेवार व स्नेहल हंचाटे पाचवी श्रुति माचपल्ले शहरी मुलात प्रथम खुजाओद्दीन नाजमोद्दीन द्वितीय संकेत शेरीकर तृतीय पुष्कर जाधव व श्रीतेज कुलकर्णी चौथा हर्षल चव्हाण पाचवा विश्र्वजीत जाधव या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पारितोषिक देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया गोविंदवाड व करुणा गायकवाड यांनी केले अहवाल वाचन वादविवाद प्रमुख अनिता मुळखेडे यांनी केले स्वागत व परिचय लक्ष्मी चव्हाण निकाल वाचन अनिता येलमटे व अंबिका पारसेवार, वैयक्तिक गीत प्रीती शेंडे आभार संजयराव कुलकर्णी यांनी व्यक्त केले. कल्याणमंत्र रूपाली थोरात यांनी घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार किरण नेमट माधव मठवाले वादविवाद सहप्रमुख राहुल नेटके, निलेश मांडवकर व्यवस्थेतील सर्वच शिक्षकांचे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य लाभले.

## संक्षिप्त वृत्त...

### आर पी मेडीकल कॉलेजच्या वतीने मोफत आरोग्य शिबिरात ७२ जणांची तपासणी



**पाथरी,/प्रतिनिधी:-** येथील ग्रामिण रुग्णालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने आर पी मेडीकल कॉलेज परभणी यांच्या वतीने गुरुवार १९ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता विविध आजारांवर मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.

या शिबिरात पाथरी तालुक्या सह ग्रामिण भागातील ७२ गरजू रुग्णांनी सहभाग नोंदवला यात नेत्र शस्त्रक्रीया, -हदय शस्त्रक्रीया, पोटाची शस्त्रक्रीयेचे १८ रुग्ण आढळून आले. या सर्व रुग्णांवर लवकरच परभणी येथे आर पी मेडीकल कॉलेज येथे शस्त्रक्रीया करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य सेवक संजय ढवळे यांनी दिली. डॉ सागर चौधरी, डॉ राम वडकुते, डॉ खिल्लन पटेल, डॉ प्रतिष्ठा कुमारी, डॉ प्रथ्वीराज घुगे, डॉ आकांक्षा डोंगरे, महेश कसबे,अश्फाक सय्यद, मो.शाकेर सिद्दीकी या वैद्यकीय टीम ने रुग्णांची तपासणी करून शिबिर यशस्वी केले.

### शिवाजी महाराजांची आदर्श कुटुंबव्यवस्था व स्त्रीसन्मानाची भूमिका आजही प्रेरणादायी

**पाथरी,/प्रतिनिधी:-** शिवाजी महाराजांनी उभारलेली आदर्श कुटुंबव्यवस्था, स्त्रीसन्मानाची भूमिका आणि सामाजिक समन्वयाची तत्त्वे आजही मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन विश्वास दिवाळकर यांनी केले.

नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूल येथे गुरुवार २० फेबुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशभक्ती, स्वाभिमान आणि इतिहासाची जाणीव जागवणारा हा सोहळा उत्साहात व दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव व मुख्याध्यापक प्राचार्य अनंत पांडे विराजमान होते. प्रमुख वक्ते म्हणून दिवाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्राथमिक मुख्याध्यापिका सौ. ढगे, पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील, सहपर्यवेक्षक सुनील रामपूरकर, साळवे तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते.

प्रमुख वक्ते विश्वास दिवाळकर यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. राजमाता जिजाऊ यांनी बालशिवबांना रामायण-महाभारतातील आदर्श कथा सांगून स्वराज्य, धर्मनिष्ठा आणि न्यायप्रियतेची बीजे रोवली, असे त्यांनी सांगितले. शिवरायांची युद्धनीती, गनिमी कावा, दूरदृष्टी, किल्ल्यांचे महत्त्व आणि प्रजेला दिलेले संरक्षण यावर त्यांनी प्रकाश टाकला. जाणता राजा म्हणून ओळखले जाणारे शिवाजी महाराज प्रजेच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, न्यायनिष्ठ व कर्तव्यदक्ष शासक होते, असे त्यांनी नमूद केले. अफजलखान वध हा त्यांच्या धैर्य, बुद्धिमत्ता व रणनितीचा उत्कृष्ट नमुना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच बाजीप्रभू देशपांडे यांच्या पावन बलिदानाचा उल्लेख करत स्वराज्यासाठी दिलेले त्यांचे योगदान विद्यार्थ्यांसमोर मांडले. शिवाजी महाराजांनी उभारलेली आदर्श कुटुंबव्यवस्था, स्त्रीसन्मानाची भूमिका आणि सामाजिक समन्वयाची तत्त्वे आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य अनंत पांडे म्हणाले, शिवाजी महाराजांची जयंती हा केवळ उत्सव नसून तो आनंदोत्सव आहे. आपण जयंतीसोबत जन्मोत्सव साजरा करून त्यांच्या आदर्शांचा आपल्या दैनंदिन जीवनात अवलंब केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिवरायांचे शौर्य, प्रामाणिकपणा, संघटनशक्ती आणि राष्ट्रप्रेम यांचा आदर्श ठेवून जीवनात प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. पंचपरिवर्तन, आदर्श कुटुंबव्यवस्था, सामाजिक बांधिलकी आणि नैतिक मूल्यांचे पालन हीच खरी शिवजयंती साजरी करण्याची पद्धत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्राचार्य पांडे हे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत विविध उपक्रम राबवले जात असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले जाते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल गोरकट्टे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनील रामपूरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीपाद कुलकर्णी, शिवप्रसाद कोरे, सुनील तुरुकमाने, वसंत पुरी, गोपाल रोडे तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी विशेष परिश्रम घेतले. शिवाजी महाराजांच्या जयघोषाने आणि देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान, प्रेरणा आणि राष्ट्रनिष्ठा जागवणारा हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

### जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे पडताळणी करूनच द्यावीत; भाजप नगरसेवकांचे आयुक्तांना निवेदन : चुकीच्या प्रमाणपत्रांवर कारवाईची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** जन्म व मृत्यू प्रमाणपत्रे देताना सखोल पडताळणी करूनच प्रमाणपत्र देण्यात यावे तसेच कोणत्याही दबावाखाली येऊन चुकीची प्रमाणपत्रे देऊ नयेत, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. नगरसेवक रितेश झांबड, सौ. गिरीजा शंकर आजेगावकर, सौ. वैशाली दैठणकर, सौ. सुशिला थोरात, सपना जुक्टे, डॉ. केदार खटींग, गणेश टाक आदींनी बुधवार १८ फेब्रुवारी रोजी महापालिका आयुक्तांना एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, नूतन महापौर यांनी अलीकडेच जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयास भेट देऊन प्रलंबित प्रमाणपत्रांच्या बाबत अधिकाऱ्यांना विचारणा केली. प्रमाणपत्रे देण्यात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करण्याचा त्यांचा दृष्टिकोन स्वागतार्ह असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, कोणतेही प्रमाणपत्र शहानिशा, कागदपत्रांची तपासणी व आवश्यक पुरावे पडताळल्याशिवाय देण्यात येऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

यापूर्वी परभणी शहरात बांगलादेशी घुसखोरीच्या प्रकरणात हजारो व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्यात आल्याचा मुद्दा राज्यभर गाजला होता. अशा प्रकारचे प्रकार पुन्हा घडल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. तसेच या प्रकरणी मुख्यमंत्री यांच्याकडेही रीतसर तक्रार रण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# जिंतूर शहरात सांस्कृतिक कार्यक्रमांनी शिवजन्मोत्सव सोहळा साजरा

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा उत्साहात जिंतूर। प्रतिनिधी- प्रतीवर्षाप्रमाणे यंदाही जिंतूर शहरात बहुजन प्रतिपालक, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, कुळवाडी भूषण तथा रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९६ वा जयंती सोहळा सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुवार, दि. १९ फब्रुवारी रोजी शहरातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येऊन संपूर्ण शहरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते. जयंतीनिमित्त शहरातील प्रमुख मार्ग भगव्या पताकांनी सजविण्यात आले होते. सकाळी ९ वाजता नियोजित पुतळा परिसरात जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने शिवजन्माचा पाळणा, प्रतिमा पूजन व ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर अण्णाभाऊ साठे चौकातून तहसीलदार शीतल कच्छवे, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे तसेच नायब तहसीलदार गायकवाड यांच्या हस्ते पूजन करून भव्य मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. या मिरवणुकीत अश्वारूढ बालशिवाजीराजे, माँ साहेब जिजाबाई, तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या वेषभूषेतील चिमुकल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. शिवशाही मर्दानी आखाड्याच्या वतीने शिवकालीन तलवारबाजी, दांडपट्टा, लाठी-काठी यांसारख्या युद्धकौशल्यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. तसेच कस्तुरबा गांधी विद्यालय, एकलव्य बालविद्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, ऑरचिड इंग्लिश स्कूल आदी शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लेझीमचे विविध प्रकार सादर करत मिरवणुकीची शोभा वाढवली. ढोल पथकाच्या दमदार तालावर महिला व तरुणींनी भगवे फेटे बांधून सहभाग घेतल्याने संपूर्ण वातावरण भगवेमय झाले होते. मिरवणूक शहरातील मुख्य मार्गांवरून मार्गक्रमण करत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात समारोप करण्यात आला. मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



**चौकट : राजकीय पुढाऱ्यांनी केले अभिवादन**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी मिरवणुकीत सहभागी होऊन अभिवादन केले. यामध्ये नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख, भाजप तालुका अध्यक्ष गोविंद थिटे, नगरसेवक पिंटू चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब भांबळे, पिंटू डोंबे, नगरसेवक ॲड. गोपाळ रोकडे, टिका खान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



### फिनकिड्स प्रॉस्परस पब्लिक स्कूल सेलू येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**सेलू,/प्रतिनिधी :** श्रीराम प्रतिष्ठान संचलित फिनकिड्स प्रॉस्परस पब्लिक स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी श्रीराम प्रतिष्ठान चे संस्थापक आदरणीय डॉक्टर संजय रोडगे सर मुख्याध्यापिका प्रगती शिरसागर मॅडम व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

तसेच मुलांनी मराठमोळ्या पोशाखामध्ये शिवजयंती साजरी केली. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर भाषण केली व शाळेमध्ये विविध उपक्रम राबवण्यात आले आणि विविध स्पर्धा घेण्यात आल्या. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फब्रुवारी १६३० मध्ये झाला. ते महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि हिंदू साम्राज्याचे संस्थापक होते. शिवाजी महाराज यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर १९ फेब्रुवारी १६३० रोजी झाला त्यांच्या वडिलांचे नाव शहाजीराजे व आईचे नाव जिजाबाई होते. त्यांना लहानपणापासून जिजाबाईंनी रामायण महाभारतातील गोष्टी सांगून नैतिक मूल्य आणि पराक्रमाचे धडे दिले . छत्रपती शिवाजी महाराज हे केव्हा राजे नव्हते तर ते रयतेचे राजे होते त्यांनी गुलामगिरी झुंजारून देत स्वाभिमानाचे'' हिंदवी स्वराज्य'' स्थापन केली महाराजांचे व्यक्तिमत्व शूर पराक्रमी बुद्धिमान आणि दयाळू होते ज्यांच्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात सोनेरी पान जोडले गेले.



### छत्रपती शिवाजी महाराजांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे, नायब तहसीलदार प्रशांत वाकोडकर, सतीश रेड्डी, मधूकर क्षिरसागर, राजकुमार राठोड, वैदकीय अधिकारी डॉ.बालाजी इप्पर, सहायक महसूल अधिकारी सुरेश पुंड आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## श्री गुरू बुद्धिस्वामी महाविद्यालयात शिवजयंती निमित्त भित्तीपत्रकाचे विमोचन....

**पूर्णा/प्रतिनिधी -** येथील श्री गुरू बुद्धिस्वामी महाविद्यालयात लोकप्रशासन, तत्त्वज्ञान ,अर्थशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने लोकप्रशासन विभागाद्वारे प्रशासननामा या भित्तिपत्रकाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांचे युनोस्कोच्या यादीत १२ किल्ले*, तत्त्वज्ञान विभागाद्वारे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन परिचय* आणि अर्थशास्त्र विभागाद्वारे केंद्रीय अर्थसंकल्प २०२६- २०२७ यावर आधारित विशेषांक या भित्तिपत्रकाच्या माध्यमातून प्रकाशित केला. या भित्तिपत्रकाचे विमोचन संस्थेचे सहसचिव प्रा.गोविंदराव कदम , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के .राजकुमार,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.संजय दळवी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सदरील भित्तिपत्रकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन परिचय आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे (जागतिक वारसा स्थळ )युनेस्कोच्या यादीत १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आलेला होता.

त्यापैकी महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील ०१ किल्ला यांचा समावेश युनोस्को च्या यादीमध्ये करण्यात आला. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी ,सिंधुदुर्ग, लोहगड ,साल्हेर ,सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग ,खांदेरी आणि जिंजी या १२ किल्ल्यांवर भित्तिपत्रकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला आहे आणि केंद्रीय अर्थसंकल्प यावर आधारित अर्थसंकल्पाची उद्दिष्टे ,डिजिटल आणि भविष्यातील अर्थव्यवस्था, सर्वसामान्यांसाठी घोषणा व भारतीय रुपयाची अधोपती आणि प्रगती यावर भित्तिपत्रकाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला आहे . सदरील भित्तिपत्रकामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या प्रसंगी सदरील भित्तिपत्रक तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद ,शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांची उपस्थिती होती.



## मेंदू व मणक्यांच्या आजारांविषयी जनजागृती कार्यक्रमाचे पाथरी येथे आयोजन

**पाथरी,/प्रतिनिधी :-** मेंदू व मणक्यांचे आजार हे अचानक उद्भवणारे (आपत्कालीन) तसेच नियोजित उपचारांची गरज असणारे () अशा दोन्ही प्रकारांत आढळतात. या आजारांबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये योग्य माहिती व जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने डॉ आनंद डंक, मेंदू विकार तज्ज्ञ, मेडिकवर हॉस्पीटल ,यांच्या मार्गदर्शनाखाली पाथरी येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात मेंदूतील रक्तस्राव, स्ट्रोक, डोक्याला झालेली दुखापत, फिट्स (अपस्मार), मेंदूतील गाठी (ट्यूमर), तसेच मणक्याचे विकार, स्लिप डिस्क, पाठदुखी, हात-पायात बधिरपणा किंवा अशक्तपणा अशा आजारांची लक्षणे, निदान व आधुनिक उपचारपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. आनंद डांक यांनी सांगितले की, ''स्ट्रोक किंवा डोक्याला झालेली गंभीर दुखापत यांसारख्या आपत्कालीन परिस्थितीत 'गोल्डन अवर' अत्यंत महत्त्वाचा असतो. योग्य वेळी उपचार मिळाल्यास रुग्णाचे प्राण वाचू शकतात आणि कायमस्वरूपी अपंगत्व टाळता येऊ शकते. तसेच मणक्याच्या व मेंदूच्या अनेक आजारांवर आधुनिक शस्त्रक्रिया व औषधोपचारांद्वारे प्रभावी उपचार उपलब्ध आहेत.''



या उपक्रमाद्वारे ग्रामीण भागातील नागरिकांना मेंदू व मणक्यांच्या आजारांची प्रारंभिक लक्षणे ओळखणे, वेळेवर तज्ज्ञांचा सल्ला घेणे आणि गैरसमज दूर करणे यावर माहिती दिली. कार्यक्रमात उपस्थित पत्रकारांनी प्रश्नोत्तर सत्राद्वारे थेट तज्ज्ञांशी संवाद साधला .पाथरी व परिसरातील नागरिकांनी अद्यावत मेंदू विकार सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मेडिकव्हर हॉस्पिटल चे सेंटर हेड डॉ विशाल कुटे यांनी केले. या वेळी मेडीकव्हर हॉस्पिटल चे सहकारी जयदिप रनसिंग, गिरीश घोटणकर, स्वप्नील भुलकर यांची उपस्थिती होती

### शेतकऱ्याला फसवून विविध शासकीय योजनेचा लाभ घेत शासनाची लाखो रुपयांची फसवणूक

**मानवत,/प्रतिनिधी-** सदरील इसम प्रभू सोमला चव्हाण याने बाबाराव माणिकराव घुगे या शेतकऱ्याची गेली ५५ वर्षापासून तलाठी हातात धरून आठ एकर जमीन स्वतःच्या नावी केली.

घटना अशी की माणिकराव मारोतराव घुगे यांनी १९६७ ला प्रभू सोमला चव्हाण,रामा सोमला चव्हाण,देशा सोमला चव्हाण आणि...यांना सर्वे नंबर ९९/२ मधून आठ एकर जमीन विकली .चार- पाच वर्षांनी या चारही भावाने गावातील मुक्ताराम किशन घुगे यांना विकून टाकली .परंतु तुकडे जोड, तुकडे बंदी कायद्यामुळे सर्वे नंबर चे गट नंबर होऊन ९९/१,९९/२,आणि १०० याचे दोन गट होऊन १९९ आणि २०० गट झाले आणि त्यामध्ये प्रभू सोमला चव्हाण याच्या नावावर ८ एकर आणि सध्या बाबाराव भिसे यांच्या नवी ४ एकर आणि शिवदास कुटे यांच्या नावी ४ एकर त्या चौघा भावांनी विकलेली जमीन आहे. प्रभु सोमला चव्हाण यांच्या नावी जी आठ एकर जमीन आहे त्याला कोणताही पुरावा नसून त्याने तलाठी आणि इतर अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून जमीन नावी करून घेतली.

नंतर त्या ७/१२ च्या आधारे स्टेट बँक ऑफ इंडिया कडून पीककर्ज तसेच आतापर्यंत शेतकरी सन्मान निधी योजना , पीकविमा तसेच शेतकऱ्याला शासनाचे मिळणारे विविध अनुदान त्याने आतापर्यंत लादले.सदरील तपास आता उपविभागीय दंडाधिकारी सेलू यांच्याकडे असून घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शासकीय कर्मचाऱ्याने सदरील प्रभू सोमला चव्हाण यांचे सर्व शासकीय लाभ त्वरित थांबावे अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात आली आहे.

## जिंतूरमध्ये शिवजयंती उत्सव जल्लोषात साजरा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** आज दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिंतूर शहरात सार्वजनिक शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच शहरातील विविध भागांत ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या पताकांनी सजलेल्या परिसरात आणि ''जय जिजाऊ, जय शिवराय''च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

शिवरायांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मा. उपनगराध्यक्ष बाळासाहेब भांबळे, नगरसेवक तथा न. प. गटनेते अशोक बंड, नगरसेवक जाबेर भाई मुल्ला यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आपल्या भाषणातून शिवरायांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्वराज्य संकल्पनेचा, शौर्य, पराक्रम व न्यायनिष्ठ प्रशासनाचा आदर्श आजच्या पिढीने आत्मसात करावा, असे आवाहन केले. शिवरायांचे जीवनचरित्र हे केवळ इतिहास नसून प्रेरणादायी आदर्श आहे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान शिवचरित्रावर आधारित प्रभावी भाषणे, पोवाडे व सांस्कृतिक सादरीकरणे सादर करण्यात आली. युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत उत्सवात रंगत आणली. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित राहून कार्यक्रमाला ऐतिहासिक व सांस्कृतिक स्वरूप दिले. शहरातील विविध सामाजिक संघटना, मंडळे व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्सव यशस्वी केला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकमुखाने ''जय जिजाऊ, जय शिवराय''चा नारा देत शिवरायांच्या आदर्शांनुसार समाजकार्यात योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला.एकूणच, जिंतूर शहरातील यंदाची शिवजयंती भक्तीभाव, उत्साह आणि ऐतिहासिक अभिमानाच्या वातावरणात संपन्न झाली.



### प्रतापराव घुगे यांचे निधन



**जिंतूर,/प्रतिनिधी :** प्रतापराव शेषराव घुगे पाटील यांचे १९ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी दुःखद निधन झाले. विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय व्हावी म्हणून ओम शिक्षण संस्थेची इटोली येथे १९९६ ला स्थापना केली. १९९७ ला माध्यमिक आश्रमशाळा इटोली ची सुरुवात झाली तसेच २००८ मध्ये संत भगवानबाबा उच्च माध्यमिक आश्रमशाळा कला व विज्ञान इटोली येथे सुरू केली. त्यांच्या पश्चात दोन मुले केशव घुगे, विठ्ठल घुगे एक मुलगी व नातू असा मोठा परिवार आहे.

## अग्रलेख...

# एका रोबोटाने, धरिले वेठीला...

आपली सारी बुद्धिमत्ता पणाला लावून माणसाने विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने निर्माण केलेल्या रोबोटच्या मेंदूत आज्ञावलीचा अफाट साठा भरला असला, तरी मन नावाचा मानवी अवयव त्यास बहाल करण्याचे तंत्रज्ञान अद्याप उपलब्ध नाही. भारताच्या दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेच्या ठरलेल्या व कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राच्या नव्या जागतिक वाटचालीस दिशा देणारे दालन ठरलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक जागतिक परिषदेत सादर करण्यात आलेल्या त्या प्रयोगातील रोबोटने तिथल्या तिथे आपले मन मोकळे करून, गलगोटियास युनिव्हर्सिटीच्या प्रतिनिधीचा खोटेपणा स्वतःच उघडकीस आणला असता किंवा आपल्या निर्मितीचे श्रेय घेणाऱ्या खोट्या माहितीने वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्या केली असती. राजधानी दिल्लीत सध्या 'एआय इम्पॅक्ट समिट' नावाची जागतिक परिषद सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात जागतिक नेतृत्व करण्याच्या संधीची दालने भारतासाठी खुली होण्याची संधी या परिषदेतून भारतास लाभली आहे. भारत मंडपम येथे सुरू असलेल्या या परिषदेत ग्रेटर नॉयडामधील गलगोटियास युनिव्हर्सिटी या खाजगी विद्यापीठाच्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक स्टॉलवर प्रदर्शित करण्यात आलेला ओरियॉन नावाचा यांत्रिक कुत्रा अभिमानाने मिरवला गेला. या कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त यांत्रिक कुत्र्याचे तंत्रज्ञान आपणच विकसित केल्याचा दावा विद्यापीठाच्या प्रतिनिधीकडून केला गेला, तेव्हा तो ओरियॉन बाजूलाच उभा होता. आज्ञावलीनुसार आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखविणाऱ्या काही यांत्रिक कृती त्याने करून दाखविल्या; या विद्यापीठाने त्याच्या निर्मितीचे तंत्रज्ञान विकसित केले आहे, या तद्दन खोट्या माहितीवर मात्र त्याला काहीच करता आले नाही. कारण रोबोट कृत्रिम असला तरी माणसांसारखे मन नसते. सुमारे दोन वर्षांपूर्वी दक्षिण कोरियामधील गुमी सिटी कौन्सिल नावाच्या एका भागात प्रशासकीय कामासाठी तैनात रोबो एके दिवशी जिन्याच्या पायऱ्यांवरून खाली पडलेल्या अवस्थेत आढळला. सहसा यंत्रमानवाच्या तंत्रज्ञानात अशी कृती आढळत नसल्याने त्याने आत्महत्या केली, अशा चर्चेला जगभर ऊत आला आणि त्याच्या आत्महत्येची कारणे शोधण्यास सुरुवात झाली. कामाचा ताण असह्य झाल्याने व कामास प्रतिष्ठा मिळत नसल्याने त्याने आत्महत्या केली असा गमतीदार निष्कर्ष समाजमाध्यमांवर निघू लागला. प्रत्यक्षात हा त्यामधील तांत्रिक बिघाडाचा परिणाम होता. काही वर्षांपूर्वी अमेरिकेत सुरक्षा रक्षकाचे काम करणाऱ्या एका रोबोटने एका तळ्यात स्वतःस झोकून दिले, तेव्हाही नोकरीला कंटाळून त्याने आत्महत्या केल्याची चर्चा झालीच होती. पण रोबोटना मनच नसल्यामुळे थकवा, कंटाळा आणि खरेखोटेपणा अशा भावना नसतात; गलगोटियास युनिव्हर्सिटीच्या प्रतिनिधीची तद्दन खोटी फुशारकी सहन करूनही ओरियॉन नावाचा हा यांत्रिक कुत्रा शांतपणे बाजूला उभाच होता. या यांत्रिक कुत्र्याचे तंत्रज्ञान गलगोटियास युनिव्हर्सिटीत विकसित करण्यात आले आहे, असे या प्रतिनिधीने सांगितल्यानंतर लगेचच, प्रत्यक्षात मात्र तो चीनमध्ये बनविलेला रोबोट असल्याचे उघडकीस आले. हे खोटेपणाचे पितळ उघडे पडताच त्यांना भारताच्या या प्रतिष्ठित मंचावरून गाशा गुंडाळण्याचा आदेश देण्यात आला. निखळ बुद्धिमत्तेचे पारदर्शकपणे स्वागत करण्यासाठी आयोजित या परिषदेच्या जागतिक मंचाचा गैरफायदा घेऊन कृत्रिम बुद्धिमत्तेचे 'कॉपीपेस्ट तंत्रज्ञान' या युनिव्हर्सिटीच्या अंगलट तर आलेच; एका खोट्यापायी भारताच्या प्रतिष्ठेवरही समाजमाध्यमांतून प्रश्नचिन्हे उमटू लागली आहेत. यांत्रिक कुत्र्याचे तंत्रज्ञान चीनमध्ये विकसित झाले असून युनिव्हर्सिटीने दिलेली माहिती चुकीची व खोटी आहे, याची शहानिशा समाजमाध्यमे आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांनी केल्यानंतर आता युनिव्हर्सिटीच्या स्टॉलची जागाच हटविण्याचा निर्णय घ्यावा लागल्याने, विद्यापीठाच्या या खोटेपणा किंवा खोडकरपणापायी कोणत्या अवघड परिस्थितीस आयोजकांना सामोरे जावे लागले असेल, याची कल्पना करता येणे कठीण नाही.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात खोटेपणाला थारा नाही, हे आता या निमित्ताने उघड झाले ही त्यातील समाधानाची बाब मानावी लागेल. कारण या एका घटनेमुळे अशा प्रकारच्या जागतिक परिषदांमध्ये केवळ स्वतःच्या प्रज्ञा आणि प्रतिभेचाच आविष्कार दिसला पाहिजे, असा फतवा जारी करून बजावण्याची वेळ सरकारी यंत्रणा व मंत्रालयावर आली. अर्थात युनिव्हर्सिटीच्या या खोटारडेपणामुळे भारताची अब्रू गेली, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कारण एका युनिव्हर्सिटीकडून कृत्रिम बुद्धिमत्तेची कॉपी उघडकीस आल्याने संपूर्ण भारतीय तंत्रज्ञानावर आक्षेप घेणे चुकीचे ठरणार आहे. याचा राष्ट्रीय प्रतिष्ठेवर काही परिणाम होईल किंवा कसे, हे लगेचच स्पष्ट होणार नाही, पण ही घटना या क्षेत्रात कायमची नोंदली जाणार असल्याने, या क्षेत्रात काम करणाऱ्यांना आता अधिक पारदर्शकपणे व सावधपणे आपल्या बुद्धिकौशल्यावर आधारित तंत्रज्ञानाची कास धरावी लागेल, हे स्पष्ट झाले आहे. या प्रकारामुळे देशाच्या सामाजिक, सरकारी आणि राजकीय स्तरावर काहीसा परिणाम झाला आहे हे खरे आहे. कारण भारतीय प्रज्ञेचे प्रदर्शन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या प्रतिष्ठित परिषदेत चिनी बनावटीच्या वस्तूंचे प्रदर्शन भरविले गेल्याच्या टीकेमुळे आता भारताची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील समुदाय, कंपन्या आणि विद्यापीठांना आता अधिक सखोल तपासणी आणि स्पष्टता व पारदर्शकता आवश्यक आहे, हे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. जागतिक मंचांवर देशाच्या प्रतिष्ठेला मान्यता मिळविण्याच्या प्रामाणिक प्रयत्नांना एखादा खोडसाळपणादेखील किती हानिकारक ठरू शकतो, हे या प्रकारामुळे दिसून आले आहे. आता या प्रकारामुळे भविष्यात भारतीय तंत्रज्ञान अधिक प्रामाणिक व पारदर्शी राहील अशी अपेक्षा करता येईल. कारण या क्षेत्रातील कोणाकडूनही केले जाणारे कोणतेही दावे-प्रतिदावे सत्यतेच्या कठोर निकषावर तपासून घेतले जातील. एकदा तोंड पोळल्यावर पुढचा घोटही फुंकून पिण्याचा शहाणपणा शिकण्यासाठी ही लाजीरवाणी घटना काहीशी उपकारकच म्हणावी लागेल. अशा घटनांतून देशाची प्रतिष्ठाही पणाला लागलेली असते.

जगभर विकसित होत असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा नैतिक, सुरक्षित आणि सर्वसमावेशक विकास कसा करता येईल आणि या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर विधायक कामासाठी व मानवजातीच्या कल्याणासाठी कसा केला जाईल, यावर धोरणात्मक संवाद साधण्यासाठीचा मंच म्हणून या परिषदेकडे पाहिले जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सर्वांना समान फायदे देणारा ठरावा व जबाबदारीने केला जावा, यावर परिषदेचा मुख्य भर आहे. यासाठी जगभरातील अनेक देश अनेक उपाय सुचवत आहेत, तर भारताने प्रत्यक्ष कृतीद्वारे यासाठी पुढाकार घेतला आहे. जगात हे तंत्रज्ञान भन्नाट वेगाने विकसित होत असले, तरी त्याचे लाभ सर्व देशांना सारख्याच प्रमाणात मिळत नाहीत. म्हणजेच या क्षेत्रातही मोठा जागतिक असमतोल निर्माण होत असून अनेक देश कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात अनुशेषग्रस्त राहण्याची भीती आहे. अशा देशांना या क्षेत्राचे लाभ मिळावेत, विकसनशील देशांमध्येही कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुलभ करणे व नवोद्योगांना या क्षेत्राच्या वापरासाठी प्रोत्साहन देणे ही भारताची भूमिका मान्य करून अनेक जागतिक नामवंत उद्योगांनी त्यामध्ये सहभागाची तयारी दर्शविली आहे. मायक्रोसॉफ्ट, गुगलसारख्या कंपन्या भारतासोबत यासाठी काम करण्यास उत्सुक असल्याचे संकेत या परिषदेतून मिळाले आहेत, तर भारतातील लाखो नागरिकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विधायक वापरासाठी नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची वचनबद्धता व्यक्त केली आहे. या क्षेत्राच्या संभाव्य गैरवापरातून होणाऱ्या हानीचे भय वाढत असताना व सुरक्षितता, जबाबदारीची जाणीव आणि पारदर्शकता अशा जाणिवा जपल्या जात असून भारताच्या या प्रयत्नांची जागतिक स्तरावर स्तुती होत असताना, चिनी बनावटीचे प्रदर्शन घडविणाऱ्या या घटनेचा लाजीरवाणा प्रकार टाळावयास हवा होता, यात शंका नाही. याच गलगोटियास विद्यापीठास काही वर्षांपूर्वी, सर्वोत्तम खाजगी विद्यापीठ म्हणून गौरविण्यात आले होते, असे दिसते. त्याबाबत मतांतरेही आहेतच. आंतरराष्ट्रीय परिषदेतील त्यांच्या या कृतीमुळे या विद्यापीठाच्या प्रतिष्ठेसही धक्का लागला आहे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# संवाद साधतील वाहने...

सुमारे सात हजार वर्षांपूर्वी समुद्रावर चालू शकेल अशी नौका कुवैतमधील उत्खननात दिसून आली. प्राण्यांचा वापर करून प्रवास ही पद्धत तर अनेक शतकांपासून लोकप्रिय आहे. अजूनही अनेक दुर्गम भागात प्रचलित आहे. उद्याच्या तंत्रमय भविष्यात अनेक पैलू क्रांतिकारी पद्धतीने बदलणार आहेत. अनेक उपकरणे, प्रथा, प्रक्रिया कालबाह्य होतील. मग या सर्व उत्क्रांतीला वाहन कसे अपवाद ठरेल? २० व्या शतकात संगणक जन्माला आले. पूर्वी खूप मोठ्या आकाराचे हे उपकरण स्वस्त, छोटे आणि शक्तिशाली होत गेले. हे तिन्ही प्रवाह एकाच वेळी कार्यरत होते. भौतिक जग आणि संगणकीय बिट, बाईटचे व्हर्च्युअल जग पूर्णपणे वेगळे होते. हे २०१० नंतर बदलू लागले. २०२६ नंतर त्यात आमूलाग्र बदल घडतील. सेलफोन, जीपीएस, इंटरनेट आणि नॅनो उर्फ सूक्ष्म तंत्रज्ञान यांच्या संगमातून एक अत्यंत वेगळ्याच प्रकारचे स्मार्ट जग लवकरच आपल्या आसपास दिसू लागणार आहे. संगणकीय सूक्ष्मतंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल; याला 'स्मार्ट कॉम्प्युटिंग' म्हटले जाते.

भविष्यकाळात एक-दोन किलोमीटरवर वाहतूक कोंडीची लक्षणे दिसू लागताच गाडीतील जीपीएस यंत्रणा पर्यायी मार्ग शोधेल. तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, तसतशी आपली वाहनेही अधिक स्मार्ट होत चालली आहेत. उद्याचे वाहन केवळ चालवण्यापुरते मर्यादित न राहता, आपले साथीदार, मदतनीस आणि सुरक्षिततेचे संरक्षक ठरणार आहे. उद्याचे स्मार्ट वाहन हे पूर्णपणे इंटरनेटशी जोडलेले असेल. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि सेन्सर टेक्नॉलॉजी यांचा वापर असेल. याव्यतिरिक्त स्मार्ट वाहने प्रदूषणविरहित असतील. ती सौर किंवा विद्युत ऊर्जेवर चालतील. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि हवामान बदलावरही सकारात्मक परिणाम होईल. उद्याचे स्मार्ट वाहन हे अधिक आरामदायक, कार्यक्षम आणि सुरक्षित असेल. ते अधिक वैयक्तिकृत आणि कनेक्टेड असेल. अधिक लवचीक आणि अत्याधुनिक प्रवास पर्याय प्रदान करेल. उद्याचे वाहन रचतेच्या बाबतीतही बदलत आहे. त्यात सुटे हलते भाग कमी होऊन सिलिकॉन चिप्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, लिथियम बॅटरी असे अवयव असतील. चालकासमोरचा डॅशबोर्ड अधिकाधिक स्मार्ट होऊन चालकाला बॅटरी किती चार्ज आहे, जवळ चार्जिंग स्टेशन कुठे आहे, ट्रॅफिक जाम व वाहतुकीच्या मार्गाचा स्मार्ट सल्ला इत्यादीची इत्थंभूत माहिती देईल.

येत्या काळात वाहने अधिक प्रगत सस्पेन्शन आणि सीटिंग सिस्टिमसह येतील, जी अधिक आरामदायक प्रवास अनुभव प्रदान करतील. त्यात अधिक कार्यक्षम इंजिन असेल आणि ऊर्जा-सक्षम घटकांसह जास्त मायलेज आणि कमी उत्सर्जन देईल. इथे इलेक्ट्रिक, हायब्रीड असे अनेक घटक समाविष्ट असतील. स्मार्ट वाहने इंटरनेट आणि इतर उपकरणांशी सतत जोडलेली राहतील. यामुळे त्यांना रिअल टाईम वाहतूक माहिती, हवामानाचा अंदाज आणि इतर उपयुक्त माहिती मिळत राहील. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक सुरक्षित असेल. स्वयंचलित ब्रेकिंग, लेन-बदल करण्यात मदत आणि अंधारात दृष्टी या बाबतीत ते चुणूकदार ठरेल. चालक गाडी ठीक चालवत नसेल तर ते अनेक प्रकारे त्याला सूचना देईल. गजर, झटका, समोरील वाहन वेगात उलट येत असेल तर आपोआप स्टिअरिंग वळवणे, अनेक निकटवर्तीयांना आपत्कालीन संदेश पाठविणे आदी गोष्टी करेल. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक वैयक्तिकृत इंटीरियर आणि एक्सटीरियर डिझाईनसह उपलब्ध होईल, जे चालक आणि प्रवाशांच्या आवडीनिवडी पूर्ण करेल. उद्याचे स्मार्ट डिस्प्ले तंत्रज्ञान तुम्हाला स्मार्टफोन स्क्रीन समोर दाखवेल आणि ध्वनी सहायक (व्हॉईस असिस्टंट) तुम्हाला वाहन चालवत असताना संदेश ऐकवेल. त्यातील एआय टूल आपोआप काही निर्णय घेईल.

वाहनातील मनोरंजन प्रणाली अधिक प्रगत असेल. आपण गाडीमध्ये मागील बाजूला बसलो असल्यास समोरील सीट हे वर्क स्टेशन बनेल. त्यामुळे मनोरंजन, संगणकाचा वापर अशा अनेक गोष्टी शक्य होतील. वाहने एकमेकांशी आणि रस्त्यावरील पायाभूत सुविधांशी संवाद साधू शकतील. यामुळे सुरक्षितता वाढेल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल. यामध्ये अजून एक प्रवाह असेल तो स्वयंचलित वाहनाचा. सध्या ते प्रगत देशात प्रायोगिक स्तरावर प्रचलित आहे, पण भारतात त्याच्या अनेक समस्या आहेत. सतत बदलणारे रस्ते (आजचा नो एन्ट्री पॉईंट उद्याचा वन-वे असू शकतो), कधीही कुठूनही वाहन अथवा प्राणी प्रकट होऊ शकते, अंधारात खड्डे असू शकतात. पुढील काही वर्षांमध्ये त्यावरही उपाय सापडतील. इलेक्ट्रिक वाहने आधुनिक युगातील पर्यावरणपूरक वाहतूक स्रोत म्हणून उदयास आली आहेत. या वाहनांमध्ये पेट्रोल किंवा डिझेलऐवजी विद्युत ऊर्जा वापरली जाते. त्यामुळे प्रदूषण कमी होते आणि पर्यावरणाचे नुकसानही कमी होते.

गेल्या दशकापासून देशामध्ये हायड्रोजनवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (व इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे आणि वापरण्याचे बंधन आता घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपरिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यातलेच एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही हायड्रोजन कार चालते कशी हे आपण थोडक्यात वाचू. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे, थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाईपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते; परिणामी प्रदूषण शून्य! हायड्रोजन तीन प्रकारे मिळतो. पेट्रोलियमच्या उत्पादन प्रक्रियेतून, कोळशापासून आणि पाणी व सेंद्रिय कचऱ्यातून. 'ग्रीन' म्हणजेच पर्यावरणस्नेही असल्याने या तिसऱ्या प्रकारच्या हायड्रोजनचा वापर या वाहनांसाठी केला जातो. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना कोणतेही एक विशिष्ट तंत्रज्ञानच श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा, सर्वोत्तम विविध तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरण रक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे, असे म्हणता येईल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# रोहित पवार हे दुसरे 'शरद पवार?'

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. या घटनेने सारा महाराष्ट्र हळहळला. अजितदादा राष्ट्रवादीचे सुप्रीमो होते, राज्याच्या महायुती सरकारमध्ये सहभागी होते. त्यांच्या अकाली जाण्याने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. सत्ताधारी राष्ट्रवादीचा उत्तराधिकारी कोण, हाही प्रश्न उभा झाला. अशा हवेत अचानक दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेने जोर धरला. अजितदादांची अंतिम इच्छा या स्वरूपात विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आला. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील आणि खुद्द अजित पवार यांच्या तब्बल १२ बैठका झाल्या होत्या, असे सांगितले गेले. मात्र, अजितदादांनी आपल्या हयातीत विलीनीकरणाचा विषय कधीही छेडला नव्हता. मग या निमित्ताने अजितदादांचे काका म्हणजे शरद पवार काही वेगळा नॅरेटिव्ह सेट करू पाहत होते का? विलीनीकरण कोणाचे आणि कोणत्या पक्षात? हाही प्रश्न होता. दोन राष्ट्रवादीचे विलीनीकरण करून अजितदादांच्या राष्ट्रवादीवर ताबा मिळविण्याचा डाव होता का? मात्र, अजितदादांच्या गटाने वेगवान हालचाली केल्या. त्यामुळे काकांच्या राष्ट्रवादीला हात चोळत बसावे लागले. अजितदादांच्या निधनाच्या चौथ्याच दिवशी अजितदादांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ देवविण्यात आली. त्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्या बनल्या. आता तर सुनेत्रा पवार या राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष होत आहेत. त्यामुळे दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा विषय मागे पडला आहे.

सत्तेच्या सोबत जायचे की नाही या मुद्यावर राष्ट्रवादीत फूट पडली होती. अजित पवार यांनी बंड केले. आपले आमदार घेऊन अजितदादा महायुती सरकारमध्ये सामील झाले होते. अलिकडे विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने काका-पुतणे जवळ आले होते. विधानसभा निवडणुकीत अजितदादांना ४१ जागा जिंकता आल्या तर शरद पवारांचा पक्ष १० जागांवर थांबला. स्वतःच्या ताकदीचा अंदाज आल्याने शरद पवारांनी पुतण्याशी जुळवून घ्यायचे ठरवले होते. विलीनीकरणाच्या चर्चा सुरू होत्या काय? हा वादाचा विषय असला, तरी या चर्चा मीडियामध्ये नक्कीच चालू होत्या. त्या प्रमाणे सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रिपद मिळणार होते. जयंत पाटील अर्थमंत्री तर रोहित पवार राज्यात मंत्री होणार होते. भाजपाने रोहित यांच्या नावाला विरोध केला होता, अशी माहिती आहे. अजितदादा गटाचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे हेही दोघे विलीनीकरणाच्या विरोधात होते. आता तब्बल तीन वर्षे कुठल्याही निवडणुका नाहीत. इतका काळ रिकामे राहावे लागेल या कल्पनेनेच राष्ट्रवादीतल्या अनेकांचा रक्तदाब वाढला आहे. आपण बारामतीचे तिसरे वारसदार असताना आपला विचार होत नाही, हे पाहून रोहित पवार



गडबडले असणार. पण करणार काय? सुनेत्रा वहिनींच्या शपथविधीनंतर पार्थ आणि जय या बंधूंनी सूत्रं हाती घेतली. हे दोघे आईचे राजकारण सांभाळताना इतरांना आसपास फिरकू देत नाहीत. तोंडाला आलेला घास हिसकावला गेला, अशी भावना रोहित पवार यांची झाली असणार. त्यातून ते आज शंकासुर झालेले दिसतात. अजितदादांच्या विमानाची दुर्घटना हा अपघात होता, असे त्यांचे आजोबा शरद पवारांनी सुरुवातीलाच सांगितले असतानाही रोहित पवार सारख्या शंका उपस्थित करीत आहेत. आपण अपघात सांगितलं असताना नातू दुसरेच काही भलते सलते बोलतो आहे, हे शरद पवारांना खटकत का नाही? हे कोडे आहे. त्यांनी आपल्या नातवाला झापल्याचं ऐकिवात नाही. मुळात शरद पवार जे बोलतात ते त्यांना बोलायचे नसते हा अनेकांचा अनुभव आहे. मग आजोबानेच वेगळे बोलायला रोहित पवार यांना पुढे केले नसेल, याची खात्री नाही. रोहित पवारांना तर 'शरद पवार' व्हायचं आहे. या आधी पार्थलाही त्यांनी छळले होते. आजोबा बोलल्यानंतरही रोहित पवारांनी पत्रपरिषद आणि गौप्यस्फोटांचा सपाटा लावला आहे. हा अपघात कसा घातपात आहे हे दाखवण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा चालवली आहे. सुनेत्रा वहिनींना बदनाम करता येत नाही म्हणून मग इतरांवर शरसंधान सुरू आहे, ते सुनील तटकरेंना टार्गेट करताहेत. 'फाईल उशिराने आल्याने अजितदादांना दुसऱ्या दिवशी सकाळी विमानाने बारामतीला जावे लागले. ती फाईल प्रफुल्ल पटेल यांची होती' असेही ते सांगतात. विलीनीकरण होत नाही तर मग समोरच्याला ब्लॅकमेल करायचं. दबाव आणायचा. रोहित पवार हा आपल्या आजोबांचा 'बोलका बाहुला' आहे का? कारण शरद पवार काहीही करू शकतात.

या विमान अपघाताला महिनाही व्हायचा आहे. विमानाचा अपघात आहे. महत्त्वाचा माणूस त्यात मारला गेला आहे. विमान अपघाताची चौकशी, तपास हा सारा प्रकार गुंतागुंतीचा असतो. दुसऱ्यांदा आमदार झालेल्या रोहित पवारांना हे कळत नसेल अशातला भाग नाही. तरीही ते उठसूट आरोप करीत आहेत. त्यांना खाज सुटली काय की ते स्वतःचे उपद्रवमूल्य सिद्ध करू पाहत आहेत? शंकासुराच्या या उतावीळपणाला काय म्हणायचं ? नागरी उड्डयन मंत्रालय तसेच महाराष्ट्राची सीआयडी या अपघाताची चौकशी करीत आहेत. सुरुवातीला गप्प असलेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या अपघाताची सीबीआयमार्फत चौकशी करा, अशी मागणी महाराष्ट्र सरकारकडे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ही मागणी मान्यही करतील. त्या प्रमाणे तपास होईल. पण रोहित पवारांना कशाची घाई झाली आहे ते कळायला मार्ग नाही. अपघातानंतर लागलेल्या आगीत या विमानाचा ब्लॅक बॉक्स खराब झाला आहे. त्यामुळे आतल्या वैमानिकांचं शेवटचं संभाषण मिळवणं जड जात आहे. कुठल्याही विमान अपघातात ही समस्या येते. ती दुरुस्त केली जाते. रोहित म्हणतात त्या प्रमाणे तो घातपात असेल तर तो कशाने झाला? कोणी केला? कशासाठी केला? हे प्रश्न उपस्थित होतात. 'विमान मुद्दाम आदळलं' असं रोहित म्हणतात. कुठलाही पायलट असं विमान आदळू शकतो का? विमानात दोन टँक भरून इंधन होतं, असे ते म्हणतात. विमानात इंधन भरून ठेवायची टँक घ्यायला ती काय 'वडापाव'ची गाडी आहे? विमान कंपनीकडेही ते बोट दाखवतात. मग आजपर्यंत त्यांचे किती अपघात झाले? ते सारे तांत्रिक मुद्दे तपासावे लागतील. त्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे. पण वाट पाहायची सोडून रोहित पवार वारंवार अकलेचे तारे तोडताहेत ते भयंकर आहे. मला त्यांचे पॉवर प्रेझेंटेशन कव्हर करणाऱ्या मीडियाची कीव येते. एकही पत्रकार उलट प्रश्न करीत नाही. रोहित जे बोलतात ते श्रद्धा भावनेने ऐकून घेतात. रोहित काहीही बोलतील. पण ते कायद्याच्या कसोटीवर टिकायला पाहिजे ना. सध्या जे सुरू आहे ते बेताल सुरू आहे. बिनबुडाचे आणि निरर्थक सुरू आहे. शरद पवारही हेच करायचे. मुंबईमध्ये ११ बॉम्बस्फोट झाले होते तेव्हा शरद पवारांनी काय थाप मारली होती ते आठवा. शरद पवारांच्या थापांना कधी 'गुगली' तर कधी 'भाकरी फिरवली' असे सांगितले गेले. आजोबाने केले तेच सध्या नातू करतो आहे. खरे तर शरद पवारांनी आता रिटायर व्हायला पाहिजे. राजरोस थापेबाजीचा त्यांचा वारसा चालवायला नातू आला आहे. लवकरच राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे. त्यात अजितदादांना श्रद्धांजली वाहणारा शोक प्रस्ताव येणार आहे. सीबीआय चौकशी जाहीर होणार असेल तर चर्चा काय करणार? मग रोहित पवार यांचे तोंड गप्प करण्यासाठी सीबीआय चौकशी लावली काय? सध्या सारे संशयाच्या घेऱ्यात आहे. सुनेत्रा वहिनींच्या हातात गेम आहे. सारे बोलताहेत. पण त्या गप्प आहेत. ज्या दिवशी सुनेत्रा वहिनी बोलायला लागतील तेव्हा भूकंप होईल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)


## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# पालकांचेच समुपदेशन व्हावे!

सध्या परीक्षांचा हंगाम आहे. बारावीची परीक्षा सुरू आहेच आणि आता दहावीची सुरू होते आहे. आता या परीक्षांना अर्थ उरला नाही, प्रवेश परीक्षांवरच सगळा भर असतो असे कोणीही म्हणत असले, तरी पूर्वापार बोर्डाच्या परीक्षांना असलेले महत्त्व अबाधित आहे. त्यातही दहावीची परीक्षा तर विद्यार्थ्यांच्या जीवनातील मोठा टप्पा आहे. यानंतरच त्यांच्या जीवनाची दिशा खऱ्या अर्थाने ठरते. त्यामुळे मग दहावी कधी, असे कोणी विचारले की, त्या विद्यार्थ्याला जेवढे दडपण येणार नाही तेवढा ताण पालकांच्या चेहऱ्यावर दिसतो.

विद्यार्थ्यांच्या अतिताणाची परिणती आत्महत्येत होण्याच्या घटना लक्षात घेता मागील काही वर्षांपासून बोर्डाच्या आणि शाळांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाचे कार्य हाती घेण्यात आले. ताणाचे व्यवस्थापन कसे करायचे हे समुपदेशक आणि शिक्षक सतत त्यांना समजावत असतात. अभ्यासासोबतच हे आवश्यक आहेच. पण, विद्यार्थ्यांसाठी समुपदेशक नेमताना पालकांचाही थोडा विचार व्हायला हवा. कारण बहुतांश ठिकाणी मुलांच्या तणावाचे कारण अभ्यासाइतकेच पालकांकडून येणारा दबाव हेही असल्याचे लक्षात येईल. काही घरांमध्ये तर मुलगा किंवा मुलगी आठव्या, नवव्या वर्गात गेल्यापासूनच लष्करी शिस्तीचा अवलंब केला जातो. (काही लोक याला घरात मार्शल लॉ लागला असेही म्हणतात) सर्वप्रथम गारपीट येते ती टीव्हीवर. केबल बंद करा..झाला. नंतर ट्यूशन कुठे कुठे लावायची, याचे काथ्याकूट सुरू होते. विशेष म्हणजे, असे सर्व करणारे पालक एकदाही शाळेत जाऊन शिक्षक किंवा मु'याध्यापकांशी बोलण्याची तसदी घेत नाहीत.



वास्तविक, या नाजूक वळणावर एकटे शिक्षक किंवा एकटे पालक काहीच करू शकत नाही. दोघांनी मिळून विद्यार्थ्यांचे हे वळण सोपे करायचे असते. म्हणून नवव्या वर्गापासूनच पालकांनी आपल्या पाल्याच्या शिक्षकांची भेट घेऊन त्याच्याविषयी सविस्तर बोलले पाहिजे. त्याच्या दोषांचे भांडवल न करता किंवा त्याविषयी त्याला टचटच बोलून टोचण्यापेक्षा त्याच्या गुणांच्या उत्कर्षाकडे लक्ष दिले पाहिजे. म्हणजे त्याचा कोणता विषय आवडीचा आहे किंवा पक्का आहे, हे जाणून घ्यावे. पक्का विषय कळला की कच्चा विषय आपोआपच कळतो. असे झाले की, त्याच्या त्रुटींना भरून काढण्याचे काम आपोआपच सुरू होते. पालकांनी शिक्षकांशी चांगला संवाद ठेवण्यासोबतच मुलांशीही बोलत राहिले पाहिजे. नेहमीच अभ्यासाशिवाय दुसरे काही बोलायचेच नाही, हा खाक्या चुकीचा आहे. उलट, मुलांना विश्वासात घेण्यासाठी त्याच्या आवडीच्या चांगल्या विषयावर बोलावे. म्हणजे त्याला कळू लागेल की पालक आपल्याशी चांगले बोलू शकतात. एकदा मुलांना लक्षात आले की आपण पालकांशी कोणत्याही विषयावर मोकळेपणाने बोलू शकतो, तिथे पालकांनी अर्धी लढाई जिंकली असे समजावे. कारण मुलांमध्ये पालकांविषयी विश्वास निर्माण होणे सर्वाधिक गरजेचे असते. दुर्दैवाने सध्या याचाच अभाव दिसतो. 'अरे किती महत्त्वाचे वर्ष आहे तुझे,' असे मुलांशी बोलल्याने त्याचा ताण वाढतोच. शिवाय यातून पालकांचाही ताण दिसून येतो. मुळात, या सर्व समस्यांचे मूळ एकच आहे की, बोर्डाचे निकाल पालकांसाठी प्रतिष्ठेचा मुद्दा असतो. अमक्याच्या मुलाला किंवा मुलीला ९० टक्क्यांच्या वर मिळाले, हा विचार त्यांच्या डोक्यातून जात नाही. यावर उपाय एकच आहे की, पालकांनी आपले मूल खरंच ९० टक्के किंवा त्याच्या आसपासची टक्केवारी मिळवू शकेल का, याचे आकलन करून घ्यावे. आपला मुलगा किंवा मुलगी सर्वसाधारण विद्यार्थी आहेत, ही वास्तविकता प्रथम पालकांनी स्वीकारली पाहिजे. मग तिथून पुढे त्याच्या प्रगतीचा आलेख कसा उंचावता येईल, हे शिक्षकांसोबत बोलून ठरवावे. पण, मुलांचे सर्वसाधारणपण स्वीकारताना त्यांना यासाठी कधीही टोमणे मारले जाऊ नये. कारण दहावी-बारावीचे निकाल हेच आयुष्य नाही, यशस्वी जीवनाचे अंतिम सूत्र नाही, हे आता सर्वांना कळले आहे. फक्त आपल्या अपत्याची वेळ आली की पालकांना बरेचदा ते वळतच नाही. मग तिथेच सगळी समस्या उद्‌भवते. शिवाय नववी-दहावीचे वर्ष आल्यानंतरच झोपेतून जागे झाल्यासारखे पालक मुलांच्या मागे लागतात. हे चुकीचे आहे. लहानपणापासूनच मुलांमध्ये टीव्ही, मोबाईल, अभ्यास, खेळ, संस्कारक्षम गोष्टी यांची योग्य ती शिस्त बाणवली पाहिजे. असे झाले तरच मुलांच्या बोर्डाच्या वर्षांमध्ये पालकांना त्यांना हाताळणे जड जाणार नाही. म्हणून आता गरज विद्यार्थ्यांसोबतच पालकांच्याही समुपदेशनाची आहे, असे म्हणावे लागते.

७७५५९३८८२२

### आधुनिक काळात होतायत् शेणाच्या चाकोल्या लुप्त



होळी सणाला भारतभरात वेगवेगळ्या प्रथा परंपरा आहेत. त्यातील अशीच एक परंपरा विदर्भात प्रसिद्ध आहे, ती म्हणजे शेणापासून तयार होत असलेले गोळे किंवा चाकोल्या. गाईच्या शेणापासून तयार होणाऱ्या या चकऱ्यांना चाकोल्या सुद्धा म्हटलं जातं. आधी शेणाच्या चाकोल्यांची ही माळ होळीमध्ये अर्पण करून होळी पेटवली जायची. पूर्वीच्या काळात होळीची लगबग सुरू होताच घरोघरी विशेषतः वृद्ध आणि चिमुकले चाकोल्या बनवण्यात व्यस्त दिसायचे. मात्र आता ही परंपरा कुठेतरी लुप्त झालेली दिसून येते. २५-३० वर्षांपूर्वीची होळी आणि आजची होळी यात बराच फरक पडला आहे. होळी लाकडांची असली तरीही तयार केलेला शेणाच्या चाकोल्या होळीच्या पूजेच्या वेळी टाकल्या जायच्या. लहान मुले दोन दिवसआधीच या चाकोल्या बनवायचे. त्यांनी बनविलेल्या लहान लहान चाकोल्या माळेत ओवता याव्यात यासाठी मध्यभागी एक छिद्रही ठेवले जायचे. त्या पूर्णपणे सुकल्या की त्याची माळ बनवली जायची. त्यावेळी या चाकोल्यांच्या माळा होळीत टाकल्या जायच्या.

धार्मिक मान्यतानुसार होलिका दहनात नकारात्मक गोष्टींचा नाश होतो आणि येणाऱ्या नव्या ऋतूप्रमाणे सर्वकाही नव्याने प्रारंभ होते. म्हणूनच लोक होलिका दहनाने सर्व वाईट गोष्टी जाळून टाकतात. शेणकूट जाळण्यामागील धार्मिक श्रद्धा आहे. हिंदू धर्मात गाय पूजनीय आहे आणि तिच्या शेणाची देखील पूजा केली जाते. शेणाची गोवरी शुभतेचे प्रतीक मानली जाते. तिला जाळल्याने आजूबाजूची नकारात्मक ऊर्जा निघून जाते. म्हणूनच हिंदू धर्मात जेव्हा एखाद्याचा मृत्यू होतो तेव्हा मृतदेहाजवळ शेणाची चिता रचली जाते. जेणेकरून त्या व्यक्तीच्या शरीरातील नकारात्मक ऊर्जा निघून जावी.

केवळ या कार्यात नाही तर कोणतेही धार्मिक कार्य असेल तर होम हवनमध्ये गोवरी जाळल्या जातात. हिंदू धर्मात गायीची पूजा केली जाते आणि शेण हे पवित्रतेचे प्रतीक देखील मानले जाते. शेणाचा वापर केल्याने घरात समृद्धी येते आणि नकारात्मक ऊर्जा दूर होते. अनेक वेळा गाईच्या शेणाचा वापर वनौषधी बनवण्यासाठी केला जातो. त्यामुळे होलिका दहनात शेण जाळल्यास आजूबाजूची सर्व वाईट गोष्टी, नकारात्मक ऊर्जा आणि वाईट रोगांचाही नाश होतो.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

## वाचक पत्रे

### विद्यार्थ्यांना दिलासा द्या

कोराडीत परीक्षेच्या भीतीने एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली. विद्यार्थी खूपदा परीक्षेच्या आधी अभ्यास झाला नाही म्हणून, पेपर नीट गेला नाही म्हणून, तर नापास झालो म्हणून आत्महत्या करतात. सर्वच मुलांमध्ये अपयश पचविण्याची ताकद नसते. खूपदा आई-वडिलांनी मुलांकडून अवास्तव अपेक्षा, शाळेत मास्तरांचा धाक, ट्युशनसाठी हजारो रुपये खर्च झालेले यामुळे मुलांचे मानसिक संतुलन बिघडते. अपयशाची भीती वाटते. म्हणून सर्वांनी प्रथम मुलांच्या मनाचा विचार करावा. घरातील वातावरण उगीच गंभीर ठेवू नये. परीक्षा आहे म्हणून टीव्ही, खेळणे, थोड्याशा गप्पा मारणे यावर अनावश्यक बंधन ठेवू नये. यश-अपयश काहीही येवो आम्ही तुझ्या पाठीशी आहोत ही भावना मुलांच्या मनात निर्माण करा. दुसऱ्यांशी आपल्या मुलांची स्पर्धा करू नका. सर्वांची बुद्धी समान नसते. सकारात्मक विचारांची सवय लावा. अपयश पुढील यशाची पायरी आहे हे समजावून सांगा. परीक्षा पुन्हा देता येईल पण आयुष्याचं काय? परीक्षेत अनुत्तीर्ण होऊन आयुष्यात यशस्वी झालेल्यांची उदाहरणे मुलांना सांगा. आयुष्यापेक्षा परीक्षा मोठी नाही.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### विकत घेणारेही दोषी

'पांढऱ्या कोटातील 'काळा' कारभार' हा वेधमधील लेख डॉक्टर व वैद्यकीय क्षेत्रातील अयोग्य गोष्टींचा पर्दाफाश करणारा आहे. वर्तमानात डॉक्टरकडे जाताना लोक खूप विचार करतात. कारण आपण कुठल्या साखळीत अडकून तर जाऊ नाही ना, अशी भीती मनात असते. त्याचप्रमाणे एखाद्या इस्पितळात दाखल करतानाही खूप विचार करावा लागतो. कारण दाखल करतानाच भरावी लागणारी अनामत रक्कम आणि त्यांच्या दुपटी-तिपटीने होणारे बिल! पण लहान लेकराला दाखल करून ते विकणे हे अत्यंत लज्जास्पद कृत्य असून त्याने वैद्यकीय पेशाला काळिमा फासला आहे. मुळात एखादे बालक दत्तक घेण्याचा पर्याय असताना ते विकत घेण्यासाठी त्या बाजारात जाणारेही तितकेच दोषी आहेत. हल्ली सर्वांनाच सगळं काही फटाफट हवं असतं. त्यामुळे कायदेशीर गोष्टीत होणारा विलंब टाळण्यासाठी बाळ विकत घेणारे आणि ते विकणारे डॉक्टर दोघेही घृणेस पात्र आहेत. वैद्यकीय क्षेत्राकडे आधी सन्मानाने आणि आदराने पाहिलं जायचं, पण आता या क्षेत्रात येणंही महाग झाल्यामुळे की काय, त्यात विविध कृष्णकृत्ये होताना दिसतात तेव्हा माणसाचा माणुसकीवरचा विश्वास उडतो.

**माया हेमंत भाटकर**/९८६९०७४४९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)



**लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर ता. धारूर जि. बीड चे कार्यालयात हिंदवी स्वराज्याचे सस्थापक राजाधिराज श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करनेत आली. प्रसंगी महाराजांचे प्रतिमेचे पुजन करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, दासराव मोरे, भागवतराव वगरे, नागोराव निर्मळ, अशोकराव पाटील, गनेश सोळंके, दत्तात्रय शेवाळे, नितिन सोळंके.**

## अखेर एकाही बिअर बारला परवानगी दिली नाही - ॲड. अजित देशमुख

**बीड (प्रतिनिधी) |** बीड जिल्ह्यात अधिकृत नोंदणी असलेली जवळपास साडेबाराशे बियर बार, बिअर शॉपी, देशी दारू आणि होलसेल दारू विक्रीची दुकाने आहेत. अशा परिस्थितीत सामाजिक स्वास्थ्य बिघडवायचे नसेल तर नवीन दारू दुकानांना परवानगी देऊ नका, अशी मागणी करण्यात आल्यानंतर आजच्या बैठकीमध्ये एकाही बिअर बार ला मंजुरी दिली नसल्याची माहिती ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यात दारू दुकानांमुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आम्ही सातत्याने आतापर्यंतच्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे नवीन बियर बार लायसन देऊ नका, म्हणून मागणी करत असतो. दारूने नुकसान होऊ नये, हा त्या पाठीमागचा हेतू असतो. प्रलंबित असलेल्या अनेक अर्जांपैकी काही अर्ज आजच्या बैठकीमध्ये निकाली निघणार होते. बीड जिल्ह्यातील वाढती बेकारी आणि गुन्हेगारी लक्षात घेता समाज हितासाठी व्यसनाधीनता कमी होणे गरजेचे आहे. त्यामुळे ही मागणी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांचे कडे देखील करण्यात आली होती. आजच्या बैठकीमध्ये एकाही नवीन बियर बारला परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला धन्यवाद देत सामाजिक स्वास्थ्य जपणे, ही प्रशासनाची जबाबदारी असल्याने हा निर्णय पुढेही कायम ठेवावा, असे ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

## कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात शिवजन्मोत्सव थाटामाटात संपन्न

**अंबड (प्रतिनिधी) |** दिनांक 19 फेब्रु.2026 रोजी शिवजयंती निमित्त कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात शिवजयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आजच्या या कार्यक्रमासाठी व्यासपीठावरती भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या उपाध्यक्ष मा.सौ.ज्योतीभाभी दीपकसिंह ठाकूर तसेच प्रमुख उपस्थित शालेय व्यवस्था मंडळचे अध्यक्ष मा.श्री. व्यंकटेशजी गोसावी सर तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक मा.श्री.प्रदीप जोशी सर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक मा.श्री.सुधाकर घायतडक सर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम प्रतिमा पूजन करण्यात आले . यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. आजच्या या कार्यक्रमानिमित्त चौथी अ चे विद्यार्थी मा जिजाऊ व शिवरायांच्या वेशभूषेमध्ये आले होते. आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी सर यांनी केले. तसेच पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनपटावर आधारित रोमांचक असा उत्तम पोवाडा सादर केला. अध्यक्षीय समारोपात. बोलताना ज्योती भाभी म्हणाल्या की, शिवाजी महाराजांचे चरित्र महान आहे. आजच्या या काळामध्ये शिवरायांकडून प्रेरणा घेऊन आजच्या मुलींनी न घाबरता जीवनामध्ये संघर्ष केला पाहिजे.

## अवैध गावठी कट्ट्यासह विधीसंघर्ष बालक जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**बीड |** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बंदोबस्तावर तैनात असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आज, १९ फेब्रुवारी रोजी एका विधीसंघर्ष बालकाला अवैध अग्नीशस्त्रासह ताब्यात घेतले आहे. बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात एक मुलगा कमरेला गावठी कट्टा लावून फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून पथकाने तातडीने सापळा रचून संबंधित विधीसंघर्ष बालकाची झडती घेतली असता, त्याच्याकडे एक गावठी बनावटीचा कट्टा मिळून आला. या प्रकरणी पोलिसांनी अग्नीशस्त्र जप्त करून बालकाला शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केले आहे. संबंधित बालकाविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने फत्ते केली आहे. सणासुदीच्या काळात अशा प्रकारे शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई केल्यामुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# परळी फोटोग्राफर क्रिकेट प्रीमियर लीग मध्यें छत्रपती संभाजीनगर अजिंक्य

**तभा वृत्तसेवा**

**बीड |** येथे आयोजित करण्यात आलेल्या फोटोग्राफर मैत्रीपूर्ण सामन्यातून दहा संघानी सहभाग नोंदवला होता बीड ,लातूर, अहमदपूर ,अंबाजोगाई, छ. संभाजीनगर व पुणे जिल्ह्यातून शिरूर, चाकण-आळंदी व खेड तसेच परळी येथील असोशियनचा संघ याप्रमाणे दहा संघानी यात सहभागी होऊन या सामन्याचा आनंद घेतला.



या सामन्यासाठी जेष्ठ फोटोग्राफर यशवंत चव्हाण ,हरिप्रसाद मोदाणी ,विठ्ठलराव झिलमेवाड, सुनील फुलारी यांच्या प्रमुख उपस्थितीत खेळाडू परिचय व नोणेफेक करून प्रत्येक सामन्याची सुरुवात करून देण्यात आली.बाद पद्धतीने व लकि ड्रा व्दारे ही स्पर्धा घेण्यात आली.यात विजेते ठरले ते छ.संभाजीनगर,उपविजेते परळी फोटोग्राफर असो .क्रिकेट टिम ,तृतीय क्रमांक चाकण -आळंदी तर चतुर्थ स्थान शिरूरला मिळाले. उत्कृष्ट फलंदाज कुणाल जोशी, उत्कृष्ट गोलंदाजी राम, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण तुषार पोतले यांना देण्यात आले.परळीतील आकाश गित्ते यांनी अर्धशतक व गोलंदाजी साठी त्यांना मिळालेले उत्कृष्ठ फलंदाज इतरांना देऊ केले. या साठी त्याचे खेळाडूवृत्ती दाखवून दिली.स्वताला मिळणारे पारितोषक परगावाहून आलेला मित्राला देवू केले, अतिशय खेळाडू वृत्ती दाखवली.

आयुष्यात अतिशय व्यस्त व कामाच्या ठिकाणी शारीरिक व मानसिक व्यापाला सामोरे जातांना येणारा थकवा व आजारपणाला दुर ठेवण्यासाठी विरंगुळा व आनंद निर्माण व्हावा,या करिता या खेळा सारखे सांघिक खेळ सातत्याने घेऊन ,ओळख चर्चा, सहभाग, स्नेहसंबंध निर्माण हा हेतू साध्य करण्यासाठी परळीतील फोटोग्राफर असोचे खेळाडू संतोष चव्हाण, आकाश गित्ते, झिलमेवाड बाळू, नागेश स्वामी, सिध्देश्वर वाघमारे,शिवा, महेश चव्हाण संयोजक या भुमेकेतून यशस्वी झाले. मोहन तिडके युट्यूब लाईव्ह, राजाराम तोरडमल व्हिडिओ कॅमेरा,व ड्रोन पायलट बाजिराव राठोड, यांनी सहकार्य केले.

चाकण सरपंच श्रीधर तापकिर, यशवंत चव्हाण, हरिप्रसाद मोदाणी, विठ्ठलराव झिलमेवाड,राम भाले यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यासाठी सुत्र संचलन सुनील फुलारी यांनी केले.समारोप प्रसंगी लातूरकर सतिश बरडे यांनी गुल्कोज बिस्कीट पुडे वाटप केले व स्नेह भोजनाचा आस्वाद घेत कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला.परळीतील बहुसंख्य छायाचित्रकार यांनी सहकार्य व सहभाग नोंदवला होता.

## पात्रुडमध्ये शिवरायांना रंजना आणि सुरेखा यादव यांची अनोखी मानवंदना



**तभा वृत्तसेवा**

**माजलगाव (प्रतिनिधी) |**

माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे शिवजयंतीचा उत्साह ओसंडून वाहत असतानाच, रंजना यादव आणि सुरेखा यादव या तरुणींनी आपल्या कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना आगळीवेगळी मानवंदना दिली आहे. अत्यंत आकर्षक आणि जिवंत वाटणारी महाराजांची प्रतिकृती त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून साकारली असून, परिसरातील नागरिकांकडून या दोघींच्या कलेचे मोठे कौतुक होत आहे.

अंजली किराणा आणि जनरल स्टोअर्सच्या समोर साकारण्यात आलेली ही भव्य रांगोळी पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. शिवजयंतीच्या निमित्ताने केवळ मिरवणुकांवर भर न देता, अशा प्रकारे सर्जनशील पद्धतीने महाराजांचा आदर व्यक्त करण्याचा या तरुणींचा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे.

अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह रेखाटलेली ही कलाकृती पात्रुड गावातील मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यादव भगिनींच्या या उपक्रमाचे संपूर्ण माजलगाव तालुक्यात कौतुक होत असून, सोशल मीडियावरही या रांगोळीचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

## माजी आ.स्व.पटने यांचे समाजकारणाबरोबर पत्रकारितेत मोठे योगदान-शंकरअप्पा मोगरकर

श्रीमती वंदा पटने यांची सांत्वनपर भेट,जुन्या आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा**

**परळी (प्रतिनिधी) |** माजी आमदार स्व.गंगाधर पटने यांचे समाजकारण,राजकारण,वाचन संस्कृती बरोबरच जनक्रांती साप्ताहिकाच्या माध्यमातून पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य असल्याची संवेदना शंकरअप्पा मोगरकर यांनी व्यक्त केली.श्रीमती वंदा पटने यांची सांत्वनपर भेट घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

प्रसिद्ध समाजवादी नेते, शिक्षणतज्ञ,सहकार आणि ग्रंथालय चळवळीतील कृतिशील कार्यकर्ते. बिलोली मतदारसंघातून विधानसभेवर आणि विधान परिषदेवर प्रतिनिधीत्व करत आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे माजी आमदार गंगाधर पटने यांचे दि.११ जानेवारी रोजी निधन झाले.निवृत्त शिक्षक,जेष्ठ पत्रकार



शंकरअप्पा मोगरकर यांनी त्यांच्या पत्नी वंदा पटने या परळी येथील बुरकुले यांच्याकडे आपल्या माहेरी आल्या असता भेट घेत सांत्वन केले.ग्रंथालय चळवळीला बळ देत गावोगावी वाचनालय असावेत यासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले. ते महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष होते आणि त्यांनी ग्रंथालय चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले.शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे स्व.आ.पटने यांनी बिलोली नगरपालिकेचे नगराध्यक्षपद भुषविले होते.याबरोबरच त्यांनी जनक्रांती या साप्ताहिकाचे प्रमुख संपादक म्हणून काम केलेले आहे. परळी नगरपरिषदेच्या शिक्षण सभापती पदी असताना येथील ग्रंथालयात पुस्तक भांडार वाढविण्यासाठी स्व. आ. पटणे यांनी मोलाची मदत केल्याची आठवण यावेळी मोगरकर सर यांनी व्यक्त केली. परळी शहरात गॅस एजन्सी सुरु करण्यासंदर्भात, मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वरांचे स्मारक उभे करण्यासाठी त्यांच्याशी संपर्क आला असल्याचे मोगरकर यांनी सांगितले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पारंपरिक पद्धतीने साजरी

**तभा वृत्तसेवा**

**केज प्रतिनिधी |** केज तालुक्यातील केकत सारणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती यंदा अत्यंत पारंपारिक व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. गावकऱ्यांनी एकत्र येत कोणत्याही प्रकारचा कर्कश आवाज करणारा डॉल्बी न लावता ढोल-ताशे, लेझीम, टिपरे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढून एक आदर्श निर्माण केला.



सकाळी लवकर ग्रामस्थांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सजवलेल्या बैलगाडीतून महाराजांची प्रतिमा ठेवून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक पोशाख परिधान केलेले युवक, लेझीम खेळणाऱ्या महिला व मुली, तसेच शिवकालीन वेशभूषेत सहभागी झालेले लहान मुले हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. "जय भवानी, जय शिवाजी" च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

यावेळी आंबा साखर कारखान्याचे चेअरमन मा. रमेशरावजी आडकर साहेब व ऋषीकेश भैया आडसकर साहेब यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील कार्याचा उल्लेख करून युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. सामाजिक ऐक्य, शिस्त आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमात गावातील सर्व लहान मुले, महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तरुणांनी नियोजन, शिस्त व व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडत जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. विशेष म्हणजे, ध्वनीप्रदूषण टाळत पारंपरिक पद्धतीने सण साजरा करण्याचा घेतलेला निर्णय सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.

## डॉ. राजकुमार राठोड यांच्या पुस्तकाचे सीसीआरटी उदयपूर येथे राष्ट्रीय स्तरावर प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**माजलगांव (प्रतिनिधी) |** महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक, उच्चविद्याविभूषित संशोधक, लेखक तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर डॉ. राजकुमार राठोड यांच्या "बीड जि. प. नासा व इस्रो शैक्षणिक सहल निवड परीक्षा सरावसंच" या पुस्तकाचा राष्ट्रीय स्तरावरील प्रकाशन सोहळा सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकारच्या सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र (सीसीआरटी), उदयपूर (राजस्थान) येथे अत्यंत मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या पुस्तकाचे प्रकाशन मा. श्री अभिक सरकार (क्षेत्रीय अधिकारी, सीसीआरटी उदयपूर), प्रो. डॉ. हितेश पानेरी (सीसीआरटी, उदयपूर), डॉ. जयप्रकाश



शाकद्विपीय (हिंदी राजभाषा विशेषज्ञ, राजस्थान), एच. एस. बीस्ट (उत्तराखंड) तसेच साब्यासाची दास (तेलंगणा) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या पुस्तकाचे प्रकाशक आराध्या पब्लिकेशन, माजलगांव, जिल्हा बीड (महाराष्ट्र) आहेत. रेणुकाई ग्राफिक्स यांनी मुखपृष्ठ तयार केले. या राष्ट्रीय प्रकाशन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून डॉ. सुनीता लहाने, शंतनू खरवडे, हरिभाऊ सुतार, अमृता भुमरे, चंद्रकन्या सारसेकर, प्रतिभा साबळे, जोत्स्ना पवार, अर्जुन कुचेकर आदी शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. तसेच देशातील १३ राज्यांतून आलेले प्रतिनिधी या कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ. राठोड यांच्या कार्याचा गौरव केला.

# ९ महिन्यांपूर्वी गहाळ झालेली दुचाकी पोलीसांनी शोध घेवुन मूळ मालकाला केली सुपुर्त

तभा वृत्तसेवा

**माजलगाव / प्रतिनिधी |**

पोलीस स्टेशन माजलगाव शहर हद्दीत मागील सहा महिन्यांपूर्वी शिवाजी महाराज चौक बस स्थानका समोर दृष्टी ऑप्टिकल समोरुन सि.बी शाईन नावाची मोटर सायकल महा २३ ए एम ७७१० दि.०८ मे २०२५ रोजी रात्री १२:४५ वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली होती.

ऑप्टिकल मधिल कामगार मुलगा बाहेर गावाहून रात्री उशिरा माजलगाव शहरांमध्ये परतल्यामुळे मुक्कामा साठी दृष्टी ऑप्टिकल समोर मोटर सायकल लाऊन तो ऑप्टिकल मध्ये झोपायला गेला असता रात्री १२:४५ च्या सुमारास बिना नंबर ची चार चाकी गाडी मधुन येऊन शिवाजी महाराज चौक बाजार रोड येथे गाडी उभी केली आणी चार चाकी गाडी मधुन दोन चोरटे आरोपी उतरले दृष्टी ऑप्टिकल समोर उभी असलेली सि.बी शाईन मोटर सायकल चे हँडल लॉक टोडले आणि गाडी डायरेक्ट



करुन लंपास केल्याची घटना घडली होती.

त्या वरुन सदर मोटर सायकल गहाळ झाल्याची तक्रारी पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे दाखल झाली होती. तसेच आज कालच्या धावपळीच्या युगामध्ये मोटर सायकल हि जिवणामधे आवश्यक झाली आहे. त्यामुळे मोटर सायकल ही प्रत्यकासाठी महत्वाची आणि गरजेचा विषय ठरलेली आहे. त्यामुळे सदर गहाळ झालेली मोटर सायकल शोध कामी पो.स्टे. स्तरावर विशेष पथकाची नेमणुक करुन मोटर सायकल चा शोध घेवुन संबंधित तक्रारदार व वाहन मालक डॉ.गणेश मस्के यांना गाडी सुपुर्त करुन चावी देतांना माजलगाव शहर पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह/ रामेश्वर खेत्रे, पत्रकार अजिंक्य वाघमारे उपस्थित होते. काल दि.१९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी माजलगाव शहर पोलिस स्टेशन येथे वाहन मालकाला मोटर सायकल परत केली असुन त्या बाबत डॉ.गणेश मस्के यांनी माजलगाव शहर पोलीसांचे आभार व्यक्त करुन समाधान व्यक्त केले आहे. सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.नवनित क्रॉवत, मा.अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, उपविभागीय अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह/1796 रामेश्वर खेत्रे, यांनी केलेली आहे.

## किल्ले धारूर नगरपरिषद च्या कर्मचाऱ्यांनी जपली शिवरायांची 'रयत भक्ती'

मतिमंद विद्यालयात गुलाल नव्हे, तर मायेचा घास वाटला!



**किल्ले धारूर |** ज्या राजाने अठरापगड जातीच्या रयतेवर पोटच्या पोरासारखं प्रेम केलं, त्या छत्रपती शिवरायांची जयंती म्हणजे केवळ ढोल-ताशांचा गजर नव्हे, तर वंचितांच्या डोळ्यांतील आसवं पुसणे होय. हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून धारूर नगरपरिषद कर्मचारी संघटनेने यंदाची शिवजयंती मोठ्या आगळ्यावेगळ्या आणि माणुसकीच्या पद्धतीने साजरी केली. शहरातील 'निवासी मतिमंद विद्यालया'त जाऊन या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवत त्यांना अल्पोपहाराचे वाटप केले.

नेहमी फाईलींच्या गराड्यात आणि प्रशासकीय कामात व्यस्त असणारे नगरपरिषदेचे कर्मचारी आज एका वेगळ्याच भूमिकेत दिसले. शिवजयंतीचे औचित्य साधून या सर्व कर्मचाऱ्यांनी मतिमंद शाळेला भेट दिली. यावेळी घरातील मोठ्या भावाप्रमाणे या कर्मचाऱ्यांनी शाळेतील विशेष मुलांशी संवाद साधला. त्यांच्यासाठी आणलेला खाऊ आणि अल्पोपहार पाहून मुलांच्या चेहऱ्यावर जे हसू उमलले, तीच खरी शिवरायांना दिलेली मानवंदना असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

आजकाल शिवजयंती म्हटलं की मोठ्या मिरवणुका आणि आवाज येतो, पण धारूर नगरपरिषद कर्मचारी संघटनेने शांततेत आणि संयमाने सामाजिक बांधिलकी जपली. केवळ घोषणा न देता प्रत्यक्ष कृतीतून शिवराय कसे जपावे, हे या कर्मचाऱ्यांनी दाखवून दिले. शाळेतील शिक्षकांनीही नगरपरिषदेच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. "प्रशासनात काम करणारी माणसं एवढी संवेदनशील असू शकतात, हे पाहून आनंद झाला," अशा शब्दांत शिक्षकांनी कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी कर्मचारी संघटनेच्या वतीने सांगण्यात आले की, "शिवराय हे आमचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी दीन-दलितांची सेवा करायला शिकवले. त्यामुळेच केवळ जयंतीच्या दिवशीच नव्हे, तर यापुढेही वेळोवेळी अशा सामाजिक संस्थांना मदत करण्याचा आणि जनहिताचे उपक्रम राबवण्याचा आम्ही निर्धार केला आहे."

या कार्यक्रमाला नगरपरिषदेचे सर्व विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोणत्याही राजकीय डामडौलापेक्षा 'माणुसकीचा सोहळा' म्हणून या उपक्रमाची चर्चा आज संपूर्ण धारूर शहरात होत आहे.

# दीनदयाल शोध संस्थान बीड द्वारा नानाजी देशमुख विद्यामंदिर व गोकुळ शिशु वाटिकेचे स्नेहसंमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**बीड |** दीनदयाल शोध संस्थान संचलित गेली 35 वर्षापासून सुरू असलेली गोकुळ शिशु वाटिका आणि 8 वर्षापासून सुरू असलेले नानाजी देशमुख विद्यामंदिर यांच्या वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे संपन्न झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष आणि भारतीय सांस्कृतिक वारसा या मुख्य संकल्पनेवर (थीम) आधारित या कार्यक्रमात चिमुकल्यांनी सादर केलेल्या 'भारतीय सांस्कृतिक दर्शनाने' प्रेक्षकांची मने जिंकली



कार्यक्रमात काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतच्या विविध राज्यांच्या गीतांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्राचे गौरव गीत, गुजरातमधील चैतन्यमयी गरबा, पंजाबचा जल्लोषपूर्ण भांगडा आणि राजस्थानच्या वीरभूमीचे लोकसंगीत सादर झाले. काश्मीर, बिहार, आसाम, आंध्रप्रदेश आणि बंगाली संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या बहारदार गीतांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.

विशेष आकर्षण ठरले ते अडीच-तीन वर्षांच्या चिमुकल्यांचे सादरीकरण, ज्यांच्या लयबद्ध हालचालींनी उपस्थित पालकांना आणि पाहुण्यांना अचंबित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. अर्चनाताई तुंगार होत्या. शालेय समिती सचिव डॉ सीमाताई जोशी, समिती सदस्य श्री एस एन.कुलकर्णी,श्री रवींद्रजी देशमुख,श्री गोरक्षनाथ अबूज, अनिता ताई वजूरकर,स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. जे. बी. कुलकर्णी, श्री. दीपक मुळे, डॉ. मधुराताई कुलकर्णी, श्रीमती सुनंदा ताई कुलकर्णी आणि जन शिक्षण संस्थानचे संचालक श्री. गंगाधरजी देशमुख यांची उपस्थिती होती.

# मुर्तीजापूर सावंगी शिवारात १३.६९ क्विंटल अफूची झाडे जप्त

## ४१ लाख किंमतीचे अफू जप्त, पोलिस अधीक्षक निलभ रोहन यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० फेब्रुवारी**

वसमत तालुक्यातील मुर्तीजापूर सावंगी शिवारात औंढा नागनाथ पोलिसांनी एका शेतात छापा टाकून १३.६९ क्विंटल अफूची त्याची किंमत सुमारे ४१ लाख रूपये आहे. याप्रकरणी शुक्रवार दि २० रोजी एका शेतकऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वसमत तालुक्यातील मुर्तीजापूर सावंगी शिवारात औंढा नागनाथ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जी एस राहीरे, उपनिरीक्षक दत्ता कानगुले, श्रीधर वाघमारे, अमोल इंगोले, जमादार रविकांत हरकाळ, किशोर पारीसकर यांच्यासह पोलिसांच्या पथकाने दि १९ रोजी मुर्तीजापूर शिवारात छापा टाकून गुलाब जाधव रा बरगेवाडी याच्या शेतातील अफू जप्त केला. शेतातील गव्हाच्या पिकालगत अफूची झाडे उपटून पंचनामा केला. त्यानंतर त्याचे मोजमाप केले असता तब्बल १३.६९ क्विंटल अफूची झाडे लावल्याचे स्पष्ट झाले आहे. या अफूची किंमत ४१ लाख रूपये आहे. याप्रकरणी उपनिरीक्षक दत्ता कानगुले यांच्या तक्रारीवरून औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुलाब जाधव याच्याविरूध्द दि २० फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपाधिक्षक राजकुमार केंद्रे, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली आहे.

याप्रकरणात गुलाब जाधव हा राजस्थान येथे गेला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी अधिक माहिती घेत राजस्थान पोलिसांशी संपर्क साधला. राजस्थान पोलिसांनी गुलाब जाधव यास अजमेर जिल्ह्यात एका पोलिसा ठाण्यांतर्गत ताब्यात घेतले आहे. औंढा नागनाथ पोलिस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे यांचे पथक गुलाब जाधव यास ताब्यात घेण्यासाठी रवाना झाले आहे. या आठवड्यातील अफूची शेतीवरील ही दुसरी घटना आहे.

# दहावीच्या परीक्षांना सुरूवात, ४०२ विद्यार्थी गैरहजर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० फेब्रुवारी**

जिल्ह्यातील ५४ परीक्षा केंद्रांवर शुक्रवारपासून बारावीच्या परीक्षा सुरू झाल्या असून पहिल्याच दिवशी ४०२ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी दहावीची परीक्षा सुरू झाली आहे. शुक्रवारी मराठी व उर्दु माध्यमांच्या विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात तसेच भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने जय्यत तयारी केली आहे. शिक्षण विभागाने माध्यमिक व प्राथमिक विभागाचे विशेष भरारी पथके तयार केली आहेत. तसेच बैठे पथकही केंद्रांवर तैनात करण्यात आले आहेत. बहुतांश परीक्षा केंद्रातील वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटरपर्यंत मोबाईल बंदी करण्यात आली आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी परीक्षा कालावधीत हयगय किंवा हलगर्जीपणा केल्यास त्यांच्याविरूध्द कार्यवाही करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. जिल्हा स्तरावर परीक्षा करिता कंट्रोल रूमची स्थापना करण्यात आली आहे. गैरप्रकार करणाऱ्यांवर कार्यवाहीचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत. परीक्षा कालावधीत नियुक्त पथके परीक्षा केंद्रांना भेटी देत असून गैरप्रकार करणाऱ्यांवर कार्यवाही करीत आहेत. या पथकांमध्ये माध्यमिक शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, डायटचे प्राचार्य यांचा समावेश असून ५४ बैठे पथके स्थापन करण्यात आली आहेत. पहिल्याच दिवशी दहावीच्या परीक्षा केंद्रांवर पालक आणि विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. मराठी विषयाचा शुक्रवारी पेपर झाला असून या परीक्षेला १६०३७ विद्यार्थी बसले होते तर ४०२ विद्यार्थी अनुपस्थित असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

# लिपीक संवर्ग अधिकारी, कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० फेब्रुवारी**



लिपीक संवर्ग शासकीय व निमशासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी चौथ्या वेतन आयोगापासून वेतन त्रुटी सुधारणा करण्यात याव्यात या मागणीसह इतर मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना निवेदन सादर केले आहे. २२ फेब्रुवारीपर्यंत मागण्या मान्य न केल्यास २३ पासून बेमुदत आंदोलनाचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचारी संघटनेच्यावतीने दि २० रोजी विविध मागण्यांसाठी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. चौथ्या वेतन आयोगापासून आतापर्यंतच्या वेतनातील त्रुटीमध्ये सुधारणा करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे तसेच पदोन्नती देणे, पदनाम आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. दि १६ पासून कर्मचाऱ्यांनी असहकार आंदोलन सुरू केले असून सध्या काळ्या फिती लावून काम करीत आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांनाही संघटनेच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले आहे. या आंदोलनात संजीव घुगे, वामन गाडेकर, के डी कांबळे, विजय घुगे, सारंग गायकवाड, एस यु खंदारे, सविता दळवी, यशोदा बेके, आर जी चौधरी, एन एम वाघ, एम एम सूर्यवंशी, एम यू चोपडे, एस टी कुबडे, आर एन गिरी, के बी गव्हाणे, श्रीपाद मरळे, के एम अंबरपूरे, जे जी कापसे, जी आर हिरवे, एस के संगेकर आदींनी सहभाग घेतला होता.



**हिंगोली– सेनगाव तालुक्यातील पुसेगाव येथील पंचकल्याणक प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय महोत्सवात भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी जैन मुनींचे दर्शन घेवून आशिर्वाद घेतांना दिसत आहेत. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



हिंगोली– स्मृतीशेष अँड.ग्यानबारावजी शिरसाट सेवाभावी संस्थेचे राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालय हिंगोली येथे दि १९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण महाविद्यालयाचे प्राचार्य शेळके यु एस.यांनी केले. त्याच बरोबर सर्व प्राध्यापक वर्गाने ही प्रतिमा पूजन केले. सौ.ज्योती भट, प्रा एस टी तरकसे, एम के डोलारे, प्रा जाधव एस.डी, प्रा डी डी शिरसाट, प्रा आय एस शेख, शिवशंकर डोलारे, बोरकर, इंगोले, शेख इमरान इत्यादी उपस्थित होते.

### शिवशंभो प्रतिष्ठानच्यावतीने शिवजयंती साजरी



हिंगोली– जिल्ह्यात सामाजिक एकता व समता जोपासण्यासाठी शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने दि.१९ फेब्रुवारी रोजी बुधवारी शिवशंभो प्रतिष्ठानची शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे बैठक घेण्यात आली. तत्पूर्वी प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या समोर शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले यावेळी शिवशंभो प्रतिष्ठानचे कल्याण देशमुख, अशोक अग्रवाल,अँड रावण धाबे, उमेश नागरे, ज्योती धुळे, ज्ञानेश्वर चव्हाण, डॉ. नामदेव कोरडे, सदाशिव सुर्यतळ, डॉ. गजाला यास्मीन, मनोज देशमुख, प्रा. नंदकुमार संवडकर, सुनील पाठक, विजय गुंडेकर, सुधाकर वाढवे, गोपाळराव सरनायक, परसराम जाधव, गजानन मगर, प्रा.यु.एच. बलखंडे, ॲड. नामदेव सपाटे, कृष्णा पवार यांची उपस्थिती होती.

### १२ वाहनांवर पोलिसांची कार्यवाही

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीचे उल्लंघन करणाऱ्या १२ वाहन चालकांवर पोलिसांनी विविध ठिकाणी कार्यवाही करीत त्यांच्याकडून १२ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. दारूबंदी कायद्यांतर्गत पोलिसांच्या विशेष पथकाने जिल्ह्यात ३ ठिकाणी छापे मारीत मुद्देमाल जप्त करीत दारूबंदी कायद्याअंतर्गत आरोपीतांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच जुगार कायद्यांतर्गत २ ठिकाणी छापे मारून मुद्देमाल जप्त करीत आरोपीताविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# परीक्षा बंदोबस्तात तैनात होमगार्डचा मृत्यू



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० फेब्रुवारी**

हिंगोली पथकातील होमगार्ड मोहम्मद खाजा अब्दुल रहीम एच एस सी, एस एस सी परीक्षा बंदोबस्त करिता पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथे कर्तव्यावर होते. दिनांक १९ फेब्रुवारी रोजी कर्तव्य पार पडत असताना त्यांना हृदयविकाराचा त्रास झाल्याने त्यांचे दुःखद निधन झाले. पोलीस अधीक्षक नीलभ रोहन यांनी भेट देऊन श्रद्धांजली वाहिली यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली मानवंदना देऊन पुष्प चक्र अर्पण केले. मृत्तक जवानाच्या परिवाराचे सांत्वन केले. यावेळी ग्रामीण पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे, प्रताप बागल, संजय वसिया, राजू बांगर हरीशंकर जोशी, विठ्ठल नामदेव राऊत, भागवत किशन आप्पा, शंकर मुत्तया कंठे, वामन मगर, शंकर कांदे, संतोष दुबाकलू यांनी पुष्पचक्र वाहून श्रध्दांजली दिली.

# १२ मोबाईलचे पार्सल चोरणाऱ्यास पोलिसांनी ठोकल्या बेड्या, वसमत येथील घटना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० फेब्रुवारी**

वसमत येथे एका खासगी ट्रॅव्हल्स समोर ठेवण्यात आलेले ७.३७ लाख रूपये किंमतीचे १२ मोबाईलचे पार्सल चोरणाऱ्या चोरट्यास वसमत पोलिसांच्या पथकाने दि १९ रोजी अटक केली असून त्याच्याकडून सर्व मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. दोन दिवसांपूर्वी ही घटना घडली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वसमत येथील एका मोबाईल विक्रेत्याने पूणे येथून पार्सलद्वारे १२ मोबाईल एका खासगी ट्रॅव्हल्सच्या पार्सलद्वारे मागविले होते. दि १३ रोजी सकाळी हे पार्सल ट्रॅव्हल्सच्या कार्यालयात आले होते. परंतु ट्रॅव्हल्सचे कार्यालय सकाळी बंद असल्यामुळे कार्यालयाच्या समोर पार्सल ठेवून ट्रॅव्हल्स पुढच्या प्रवासाला निघून गेली. यावेळी कार्यालय बंद असल्याचा गैरफायदा घेत एका चोरट्याने पार्सल पळविले. यामध्ये ७.३७ लाख किंमतीचे १२ मोबाईल होते.

संबंधित विक्रेत्याने पार्सलबाबत विचारणा केली असता त्यांना पार्सल आलेच नाही असे सांगण्यात आले. संबंधित विक्रेत्याचे पुरवठादाराकडे विचारणा केली असता पार्सल पाठविण्यात आल्याचे सांगितले. त्यावरून ट्रॅव्हल्स कार्यालयावर काम करणाऱ्या दत्ता सोन्नर यांनी दि १३ फेब्रुवारीचे सीसीटीव्ही चेक केले असता त्यात एका चोरट्याने पार्सल पळविल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी वसमत पोलिस ठाण्यात दि १७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. वसमत पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, सपोनि शंकर डेडवाल, जमादार संभाजी लेकुळे, नागोराव भोपे यांच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेजवरून चोरट्याची ओळख पटविली होती. पोलिसांचे पथक चोरट्याच्या मागावर होते. पोलिसांच्या पथकाने शेख आरबाज रा वसमत यास ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून सर्व मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

# शिवराम कदम यांना एमसीजे पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २० फेब्रुवारी**



पत्रकारिता क्षेत्रातील महत्त्वपूर्ण मानला जाणारा बीए एम सी जे ( मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम) या परीक्षेत शिवराम कदम यांनी प्रथम श्रेणीत संपादन केल्यामुळे त्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे पदवी प्रदान करण्यात आली.

वसमत तालुक्यातील हयातनगर येथिल रहिवासी असलेले शिवराम मारोतराव कदम यांनी नांदेड येथे असलेल्या श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयात ३ वर्ष पत्रकारिता क्षेत्रातील महत्वपुर्ण मानला जाणारा (बी.ए,एम.सी.जे) मास कम्युनीकेशन जर्नालिसम या व्यवसायभूमीक परीक्षेचा परिपूर्ण अध्ययन करून प्रथम श्रेणीत यश संपादन केले आहे. त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे शिवराम कदम यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते एमसी जे पदवी प्रदान करण्यात आले. हा पदवी वितरण सोहळा वार – शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड गुरुगोविंद सिंग जी पत्रकारिता महाविद्यालय मालेगाव रोड, नांदेड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. विकास कदम, तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशार सिंग साबळे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. शेखर घुंगरवार, डॉ.देवदत्त देशपांडे, विकास तू कदम,आदिजन विचार पिठावर उपस्थित होते. कदम यांना पदवी प्रदान करण्यात आल्यामुळे पत्रकार शंकर रहाटीकर, काशिनाथ सारंग, रुस्तुमराव सारंग, भगवान जवळेकर, मारोती बेंडे, रामजी सारंग, गोविंद सारंग यांनी अभिनंदन केले आहे.

# शिवजयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनाकडून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० फेब्रुवारी**



जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमिताने सांस्कृतिक कार्यक्रम शिवाजी सभागृह येथे आयोजित करण्यात आला.

सांस्कृतीक कार्य विभाग, सांस्कृतीक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई, यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोलीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमिताने सांस्कृतीक कार्यक्रम जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शाखाली १८ आणि १९ फब्रवारी रोजी शिवाजी सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी आमदार तानाजीराव मुटकुळे, जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, समितीच्या अध्यक्षा सुनिताताई मुळे, सचिव रजनी पाटील, उपाध्यक्षा विद्या पवार, अमोल जाधव, उल्हास पाटील, दिलीप भाकरे, नायब तहसीलदार कोकरे, नायब तहसीलदार अनिल घुगे, संजय घुगे, मंडळाधिकारी सय्यद अयुब, अनिल काळे आदींची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सामूहीक व वैयक्तिक नृत्य सादर करीत प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# नरेंद्र देवेंद्र महोत्सव : नांदेडमध्ये आज हास्य आणि काव्याची दुहेरी मेजवानी



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० फेब्रूवारी-**

सांस्कृतिक रंगत, हास्याची उधळण आणि काव्याची मैफल अशा बहारदार कार्यक्रमांनी सजलेला कुबेरनगरी मौजे लोंढेसांगवी प्रस्तुत नरेंद्रदेवेंद्र महोत्सव २०२६ येत्या २१ व २२ फेब्रुवारी रोजी चंद्रभागा केरबा गंजेवार नगरी, नवा मोंढा मैदान येथे रंगणार आहे. नांदेडकरांसाठी मनोरंजनासोबतच २५ पैठणी साड्या,१० कलर टीव्ही, २ होम थेटर अशा बक्षीसांचा वर्षाव होणार असून पूर्ण कार्यक्रमात न हसणाऱ्यांना प्रत्येकांना पाच हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष शिवप्रसाद राठी आणि संयोजक ॲड. दिलीप ठाकूर यांनी दिली.

शनिवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी आयोजित चौदाव्या मराठी हास्य दरबारात रसिकांना खळखळून हसवणारे नामवंत कलाकार सहभागी होणार आहेत. स्टँडअप कॉमेडीचे बादशहा बंडा जोशी, झी हास्य सम्राट फेम सिद्धार्थ खिल्लारे आणि शाहीर रमेश गिरी आपल्या खास शैलीतून रंगत आणणार आहेत.'चला हवा येऊ दे' फेम सतीश कासेवार यांच्या सूत्रसंचालनाखाली महिलांसाठी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा खास उपक्रम पार पडणार आहे. या स्पर्धेत सहभागी महिलांना लालपोतू कलेक्शन तर्फे २५ पैठणी व ऑरगंज्या साड्यांचे मोफत वितरण करण्यात येणार आहेत. वेळेवर उपस्थित राहणाऱ्या रसिक प्रेक्षकांसाठी भाजपा कामगार आघाडीच्या वतीने सुरेश लोट यांच्या तर्फे १० कलर टीव्हींचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

पहिल्या दिवशी महोत्सवात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात येणार आहे. नांदेड भूषण पुरस्काराने रमेश पारसेवार, ड. गजानन पिंपरखेडे, रत्नाकर वाघमारे आणि गंगाप्रसाद तोष्णीवाल यांचा सत्कार होईल. तसेच सुधाकर पत्रभूषण पुरस्काराने पन्नालाल शर्मा, अभय कुळकजाईकर, चारुदत्त चौधरी, संतोष पांडागळे आणि रामेश्वर काकडे यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. त्यामध्ये नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य डॉ. अजित गोपछडे, हळद संशोधन केंद्र अध्यक्ष हेमंत पाटील, भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजय कोडगे, आमदार डॉ. तुषार राठोड (मुखेड), भीमराव केराम (किनवट), राजेश पवार (नायगाव), जितेश अंतापुरकर (देगलूर), बालाजीराव कल्याणकर (नांदेड उत्तर), आनंदराव बोंढारकर (नांदेड दक्षिण), बाबुराव कदम (हदगाव) यांच्यासह जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना काहली, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जत्थेदार संत बाबा बलविंदरसिंघ, भाजपा महानगराध्यक्ष अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व ड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, सभागृह नेते ड. महेश कनकदंडे, मार्केट कमेटी सभापती संजय लहानकर,निवासी उप जिल्हाधिकारी किरण अंबेकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दै. प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे, कुबेर नगरीचे व्यवस्थापकीय संचालक सतीश सुगनचंद शर्मा, भगवती हॉस्पिटलचे डॉ. अंकुश देवसरकर, भाजपा कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष सुरेश लोट, भाजपा दक्षिण विधानसभा प्रमुख डॉ. सचिन उमरेकर, प्रतिष्ठित व्यापारी अंबादास लालपोतू,उद्योजक मारोतराव कंठेवाड आदींचाही सहभाग राहणार आहे.

रविवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी चोवीसावे अखिल भारतीय विराट कविसंमेलन रंगणार असून देशभरातील नामवंत कवी आपल्या रचनांनी रसिकांना मंत्रमुग्ध करतील.दोन दिवस चालणाऱ्या या भव्य सांस्कृतिक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पंडित दीनदयाल उपाध्याय स्मृती प्रतिष्ठान तर्फे करण्यात आले आह.

# उपअधीक्षक भूमी अभिलेखचे कर्मचारी संपावर; कामकाज ठप्प, नागरिकांची गैरसोय

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २० फेब्रूवारी-**

जमिनीची मोजणी, प्रॉपर्टी कार्ड, आणि सीमांकन यांसारख्या सेवा पुरवणारी प्रमुख संस्था असलेल्या

महाराष्ट्रातील भूमी अभिलेख (लॅण्ड रेकॉर्डस्) विभागाच्या कर्मचाऱ्यांनी 'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणे आणि प्रलंबित मागण्यांसाठी१८ फेब्रुवारी २०२६ पासून टप्प्याटप्प्याने संप आणि कामबंद आंदोलन सुरू केले आहे.शासनाचे भूमिअभिलेख तालुका कार्यालय (उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय) माहूरच्या भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीच्यावतीने या राज्यव्यापी असहकार आंदोलनात १८ फेब्रुवारी पासून सहभागी होत असल्याबाबतचे निवेदन माहूरचे तहसीलदार अभीजित जगताप यांना देण्यात आले.या आंदोलनामुळे जमीन मोजणी, सातबारा उतारे आणि इतर महत्त्वाच्या कागदपत्रांचे काम ठप्प झाले असून, सर्वसामान्यांची मोठी गैरसोय होत आहे.

तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणे आणि प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्रातील भूमी अभिलेख (लॅण्ड रेकॉर्डस्) विभागाच्या कर्मचाऱ्यांनी १८ फेब्रुवारी २०२६ पासून टप्प्याटप्प्याने संप आणि कामबंद आंदोलन सुरू केले आहे.आंदोलनाचे स्वरूपात २० फेब्रुवारीपासून मोजणी काम बंद, २३-२६ फेब्रुवारी दरम्यान सामूहिक रजा आणि मागण्या न मानल्यास २ मार्चपासून बेमुदत कामाचा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणे, कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करणे या प्रमुख मागण्या असून, आंदोलनाचा परिणाम म्हणजे शेती मोजणी, खरेदी-विक्रीसाठी आवश्यक नकाशे आणि भूमी अभिलेख कार्यालयातील दैनंदिन कामकाज ठप्प झाले आहेत.राज्यभर या आंदोलनाचा मोठा प्रभाव पडत आहे.पुणे येथील जमाबंदी आयुक्तांना निवेदन देऊनही निर्णय न झाल्याने कर्मचारी आक्रमक झाले आहेत,जर २ मार्चपर्यंत मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर मोठे आंदोलन उभे राहण्याचा इशारा कृती समितीने दिला आहे.

भूमी अभिलेख विभागाचा कणा असलेल्या 'भूकरमापक' पदासाठी शैक्षणिक पात्रता अभियांत्रिकी पदवी पदविका आहे. त्यांचे



काम पूर्णपणे तांत्रिक स्वरूपाचे असूनही त्यांना लिपिक वर्गीय वेतन दिले जाते. दुसरीकडे वन विभाग आणि महापालिकांमध्ये याच पदाला तांत्रिक वेतनश्रेणी लागू आहे. विशेष म्हणजे 'मॅट'ने अद्याप कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल देऊनही शासनाने अंमलबजावणी न केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

कार्यालय उपअधीक्षक भूमी अभिलेख माहूरच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावर एम. जी. कदम प. भू.,डी. बी. आईटवार क.ली.,एम व्ही चौधरी भूमापक, एच. डी डाखोरे आ. जा. लि.,एम. जी. मरशिवणे भूमापक यांनी निवेदन दिले आहे.

उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय,माहूरचे कर्मचारी संपावर गेल्याने कार्यालयाचे कामकाज ठप्प झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी, वारस नोंद, सातबारा दुरुस्ती आणि बँकेची कामे बंद पडून सामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. शेतजमिनीची मोजणी, नवीन सीमांकन आणि हद्द निश्चितीची कामे थांबली आहेत.सातबारावरील नोंदी, फेरफार, वारस नोंद, आणि बक्षीस पत्रांची कामे अशा दैनिक व्यवहारांवर परिणाम होऊन ती रखडली आहेत.बँक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे न मिळाल्याने कर्ज प्रकरणांत अडथळे निर्माण होऊन शेतकरी व व्यावसायिकांची आर्थिक कामे खोळंबली आहेत.या आंदोलनामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून, कामासाठी हेलपाटे मारावे लागत असल्याने नागरिकांमध्ये संतप्त भावना आहे.विशेष म्हणजे दस्त नोंदणी आणि मोजणी शुल्क न मिळाल्याने शासकीय महसूलात घट निर्माण होऊन शासनाचा महसूल थांबला आहे.

## मुदखेड शहरात विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

**मुदखेड** -अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत, 'प्रौढ प्रताप पुरंदर, क्षत्रिय कुलावतंय, सिंहासनाधिश्वर महाराजाधिराज' छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दि.१९ फेब्रुवारी रोजी मुदखेड शहरात अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. शहरात ठिकठिकाणी भगवे ध्वज आणि फुलांच्या सजावटीने शिवरायांना अभिवादन करण्यात आले.



शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या नियोजित ठिकाणी सकाळी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सर्वप्रथम राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते भगवा ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थीत शिवप्रेमींनी दिलेल्या 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' या घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. तसेच शहरातील विविध शासकीय आणि राजकीय कार्यालयांमध्येही शिवजयंतीचा उत्साह पाहायला मिळाला: नगरपरिषद कार्यालय येथे प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत महाराजांना अभिवादन करण्यात आले. काँग्रेस पक्ष कार्यालय येथे पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिवरायांच्या विचारांचा जागर करण्यात आला. इतर खाजगी संस्था आणि सामाजिक मंडळांनीही आपापल्या परिसरात छोटेखानी कार्यक्रम आयोजित केले होते. यावेळी उपस्थीत मान्यवरांनी शिवरायांच्या स्वराज्याची संकल्पना आणि आजच्या काळात त्यांच्या विचारांची गरज यावर प्रकाश टाकला.या सोहळ्याला मुदखेड नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधव पाटील आदींची उपस्थिती होती.

## न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**अर्धापूर** -नेहमीच आपले विविध नाविन्यपूर्ण उपक्रम घेऊन चर्चेत राहणाऱ्या एज्युव्हीजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती निमित्त शिवरायांच्या जीवन चरित्रावर आधारित भाषण स्पर्धेमध्ये रियांश पत्रे, विनायक शिवणकर, स्वरा सोनवणे, स्पर्शिका खरसकर, अद्विती कोपरे, सुहानी पवार, आरोही राऊत, समरजीत देशमुख, समर्थ गुडूप, अमित मेकाले, पुरब अंधारे,युवराज अंधारे,रिया अंधारे, वैदही राऊत, पुजा डक,समीक्षा देशमुख,मयुरी गाडेकर,गायत्री धुमाळ, श्रेया गिरी, आदी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. रिया अंधारे या विद्यार्थिनीने शिवरायांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून सर्व विद्यार्थ्यांचे मने जिंकली तर गायत्री धुमाळ या विद्यार्थिनीने देखील त्यांच्या शौर्याची गाथा विद्यार्थ्यांसमोर तेवढ्याच प्रखरपणे मांडली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेमध्ये गौरव जंगीलवाड या विद्यार्थ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले तर माँ जिजाऊंच्या वेशभूषेमध्ये कु. मनस्वी कवडे, कु. श्रेया गिरी, कु. स्पर्शिका खरसकर, कु ग्रीशा गायकवाड विद्यार्थिनीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ममता हट्टेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन तर आभार प्रदर्शन आशुतोष पुरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका रोहिणी शिंदे,कोमल डांगे, स्वाती कवडे,स्वाती पांचाळ,शिवरानी पत्रे,किरण क्षीरसागर,अलका धुमाळ,बी विजय कृष्णा,मनीषा सिंग,शांतून सिंग,दत्ता उपरे,विजय पवार,अर्चना रासवंते,कविता गाडेकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वीरित्या घडून आणल्याबद्दल शाळेची संचालक प्रवीण रावते, एज्युव्हीजनच्या प्राचार्या प्रिया रावते तसेच संस्थेचे अध्यक्ष रेखाताई रावते संस्थेचे उपाध्यक्ष अभिषेक गुरखेल यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

I {JAN AHEMAD SHAIKH CHAND} S/o.{AHEMAD HUSSAIN}Age{39}Years, Address: {AT POSTS:NEAR MADINA MASJID, LINE GALLI,DEGLOOR TQ: DEGLOOR DIST.NANDED} has changed my Name from {JANAHEMAD SHEKH CHAND } S/O {AHAMADHUSEN} to {JAN AHEMAD SHAIKH CHAND} S/O{AHEMAD HUSSAIN} TO NEW NAME {JAN AHEMAD SHAIKH CHAND AHEMAD HUSSAIN

# सहस्त्रकुंड धबधबा विकासाच्या मार्गावर; ४३ कोटींच्या योजनेने किनवटला बूस्ट

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २० फेब्रूवारी-**

किनवट तालुक्यातील निसर्गरम्य सहस्त्रकुंड धबधब्याच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल ४३ कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी आराखडा साकारला जात असून, गुरुवारी (दि. १९) या प्रस्तावित प्रकल्पाची प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली. मुख्यमंत्र्यांचे उपसचिव राजेंद्र खंदारे यांनी भेट देऊन भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना मोजमाप, सीमांकन व प्रशासकीय प्रक्रियेबाबत आवश्यक सूचना दिल्या.



मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा विकास आराखडा अंतिम टप्प्यात पोहोचला असून पर्यटनवाढ, स्थानिक युवकांसाठी रोजगारनिर्मिती आणि शासनाच्या महसुलात वाढ हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. धबधबा परिसरात पर्यटकांसाठी विविध सुविधा उभारण्याचा मानस असून या प्रकल्पासाठी आमदार भीमराव केराम यांचा पाठपुरावा सुरू आहे.

दरम्यान, पैनगंगा नदीवरील परोटी तांडा येथे मृद व जलसंधारण विभागाकडून बंधारा उभारण्याचे नियोजन आहे. या बंधाऱ्याच्या बॅकवॉटरमुळे सहस्त्रकुंड परिसर वर्षभर जलसंपन्न राहण्याची शक्यता असून भविष्यात बोटिंगसारख्या पर्यटन सुविधा उपलब्ध होण्याचे संकेत आहेत.

स्थळपाहणीवेळी तहसीलदार डॉ. शारदा चौंडकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता व्ही. पी. झरीकर, वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन धनगे, सतीश वाळकीकर, मंडळ अधिकारी सचिन भालेराव, वनपाल व्ही. एस. गुद्दे आदी उपस्थित होते. ४३ कोटींच्या या विकास आराखड्यामुळे सहस्त्रकुंड धबधब्याचा कायापालट होण्याची चिन्हे स्पष्ट झाली असून नैसर्गिक सौंदर्य आणि आधुनिक सुविधा यांचा संगम साधत हा प्रकल्प किनवट तालुक्याच्या आर्थिक व पर्यटन विकासासाठी नवे पर्व ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# बिलोलीत नगराध्यक्ष कुलकर्णी मित्रमंडळाकडुन, ग्रामविकासाच्या शिलेदारांचा गौरव



**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २० फेब्रूवारी-**

राजकारणात खासदार, आमदार, जिल्हा परीषद सदस्यांसह वरच्या पदांवरील नेत्यांचा सन्मान होणे हे नित्याचेच असते मात्र गाव - खेड्यांचा विकास घडविणाऱ्या सरपंच - उपसरपंचाचा गौरव होणे हे दुर्मिळ असते. परंतु अशा दुर्लक्षित गावपुढाऱ्याचा बिलोली नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी मित्रमंडळाच्या वतीने आयोजीत निरोप व कार्यगौरव सोहळ्यात बिलोली तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतीच्या सरपंच - उपसरपंच, सदस्यांचा केलेला सन्मान तालुक्याच्या राजकीय इतिहासात नवा अध्याय ठरला आहे. सदरील सोहळ्यात बिलोली तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, तसेच सोसायटीचे चेअरमन-व्हाइस चेअरमनसह विविध पक्षाच्या राजकीय पुढाऱ्यांना एका व्यासपिठावर आणुन गावपुढाऱ्यांना फेटा बांधुन, पुष्पहार-सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आले.२००७ मध्ये बिलोली शहराच्या समाजकारणाला राजकारणाची जोड दिलेल्या विद्यमान नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्याकडे शहरवासीयांनी मोठ्या राजकीय पक्षांतील दिग्गजांना मागे टाकत नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत सतत चौथ्यांदा नगरपरिषदेची एकहाती सत्ता दिली. कार्यसम्राट, गोर-गरीबांचे संकटमोचक ठरलेल्या संतोष कुलकर्णी समर्थकांनी तालुक्यातील गावपुढाऱ्यांच्या कार्याचा केलेला संकल्प प्रत्यक्षात उतरविला आहे. बिलोली तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतीच्या आजी - माजी सरपंच - उपसरपंचासह सदस्यांचा गौरव केला आहे. बिलोली शहराच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने विविध पक्षातील लोकप्रतिनिधी एकाच व्यासपिठावर आल्याची प्रतिक्रिया विशेष अतिथी माजी जि.प.सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड, सुनिल एंबडवार, गणेश पा.शिंपाळकर, गिरीधर पा.डाकोरे, प्रभाकर पेंटे,सदाशिव बोडके, उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर, आनंदराव बिराजदार, श्रिनिवास पा.शिंदे यांनी व्यक्त केली आहे. यावेळी माजी नगराध्यक्षा मैथिलीताई कुलकर्णी, नगरसेवक यशवंत गादगे, माजी उपनगराध्यक्ष मारोती पटाईत गटनेते नागनाथ तुम्मोड, नगरसेविका लता शिंदे, वसीम बेग, नितीन देशमुख, उमेश बिलोलीकर, अखिल सिद्दिखी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन मुकिंदर कुडके तर आभार कुलकर्णी मित्रमंडळाकडुन मानण्यात आले आहे.

# सिडकोत सार्वजनिक शिवजन्मोत्सव उत्साहात



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २० फेब्रूवारी-**

सार्वजनिक शिवजन्मोत्सव सिडको येथील सांयकाळी ६ वाजता निघालेल्या शिवजन्मोत्सव मिरवणुकीस उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे व आ.बोंढारकर यांनी भगवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी ढोल ताशाच्या गजरात लेझीम पथकाने प्रेक्षकांचे लक्ष वेधले तरआमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी पारंपारिक वाद्यांच्या तालावर ठेक धरत सुंदर आस नृत्या केल. डिझेमुक्त मिरवणूक पाहण्याचा मनसोक्त आनंद प्रेक्षकांनी घेतला.

हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे लेझीम पथकासह ढोल ताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीस भगवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला.यावेळी शिवजन्मोत्सवानिमत घेन्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण मान्यवरांच्या यांच्या हास्ते करण्यात आले.यावेळी विद्यानिकेतन हायस्कूल,इंदिरा गांधी हायस्कूल, कुसुमताई विद्यालय सिडको येथील मुलींचे लेझीम पथक ढोल ताशांच्या गजरात मिरवणूकीत लेझीमचे सादरी करण करण्यात आले. मिरवणुकी दरम्यान ठीक ठिकाणी व्यापारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी अन्नदान वाटप करण्यात आले.

या दरम्यान नवनिर्वाचित नगरसेवक संजय पाटील घोगरे,वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख,राजु लांडगे,सतिश बसवदे,विनय गिरडे,तुलजेश यादव डॉ . नरेश रायवार , डॉ.करूणा जमदाडे सह शिवजन्मोत्सवाचे अध्यक्ष साहेबराव मोरे, साहेबराव गाडे, भगवान ताटे, त्र्यंबक कदम,दिलीप कदम,उतम जाधव, गोविंद मजरे,सोपान पांडे, बालाजी हिवराळे, मधुकर गायकवाड,चंपतराव कांबळे, पप्पू गायकवाड, सखाराम गझले,ज्योती पाटील यांच्या सह हजारो शिवप्रेमीनी मिरवणूकीत सहभागी झाले होते.

त्याबरोबर ही मिरवणूक हाडको छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून निघुन कै.करूणाताई मार्गे ईच्छापुर्ती हनुमान मंदिर, ज्ञानेश्वर नगर,आण्णा भाऊ साठे चौक, सिडको छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, क्रांती चौक,संभाजी चौक ते इंदिरा गांधी महाविद्यालय मार्गे जिजाऊ सृष्टी येथे समारोप करण्यात आला.या उत्सवाचे सुत्रसंचलन दिगंबर शिंदे यांनी केले.

# शिवाजी चौकातील देशी दारू दुकाने बंद करा; महिला मंडळाचे निवेदन

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २० फेब्रूवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सिएल ३ देशी दारुचे दुकान बंद करावे, हे दुकान इतरत्र हालवावे,त्याच जागेवर दुसऱ्या भाड्याच्या खोलीत देशी दारू दुकान शिफ्ट होत असेल तर त्या सिएल ३ देशी दारु दुकानांना नगर परिषद कार्यालयाने नहारकत प्रमाणात पत्र देऊन नये राजाराम नगर,ईश्वर नगर ,गणेश नगर येथील महिला मंडळानी लोहा पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांना निवेदन देऊन महिलानी मागणी केली आहे. या निवेदनात अनेक बाबी नमुद केल्या आहेत या बाबीचा विचार करुन शासनाने निर्णय घ्यावा आन्यथा अनेक महिला या दुकानासाठी आक्रमक झाल्या आहेत आंदोलन,जागर मोर्चा,उपोषण ,करणार असल्याचे सांगितले.महिलाचे निवेदन विचारात घेतले नाही तर कार्यालयाच्या समोर चुल पेटवून त्याच ठिकाणी स्वंयपाक करण्याचे आंदोलन करण्यात येईल असे सांगितले महिलांचे निवेदन विचारात घेऊन निर्णय घ्यावा असे निवेदनात नमूद केले आहे.

नादेड- लातूर ऋषी पेट्रोल पंपाच्या उजव्या बाजूला वार्ड क्रमाक एक गणेश नगर, ईश्वर नगर, राजाराम नगर येथील सर्व महिला रहिवाशी आहेत,

या ठिकाणी सिएल ३ देशी दारूचे दुकान असून, या देशी दारू दुकानच्या आजूबाजूला , समोर व पाठीमागे सर्व कौटुंबिक रहिवाश्याची लोकवस्ती आहेत. या ठिकाणी दररोज दारुड्या लोकांचा खूप त्रास होत आहे. येथे दररोज दारु पिऊन लोक सतत भांडणे, मारामाऱ्या करून अरर्विच्या कमरेच्या खाली शिवीगाळ करत असतात. एवढेच नाहीतर आमच्या घरात घुसतात आणि महिलांची छेडछाड करतात त्याचा विपरीत परिणाम आमच्या कुटुंबावर होत आहे.येथील सिएल -३ देशी दारूच्या दुकान च्या पाठीमागे १०० फुटावर हनुमान मंदिर, मस्जीद, लहान मुलांची शाळा आहे , या दारू दुकान मुळे भाविक भक्ताना, ये जा करण्यात जाणुन बुजुन अडथळा निर्माण करतात. लहान मुला मुलीना शाळेत सोडण्यासाठी पालक,तरुण मुली ये. जा करत आसताना अनेक दारुड्याकडून खूप त्रास सहन करावा लागतो .सिएल ३ देशी दारू दुकान या ठिकाणी आले तेव्हा आजूबाजूच्या कोणत्याच रहिवाश्याची (छजउ) घेतलेली नाही. सिएल ३ देशी दारूच्या दुकान साठी मागील काळात भाडे तत्वाचा कोणताच करार नाही. दुकान मालकाने परवानगी (छजउ) दिली नाही. गेल्या वर्षापासून मालक सुध्दा त्याना सांगत आहेत दुकान खाली करा, कारण दुकानाचा सल्यफ, बाधकाम खिळखिळा झाले आहे,कधी पण पडुन जीवित हानी होऊ शकते. तसे पत्र सुद्धा त्यांने.२१/१२/२०२४ ला दुसरे पत्र १२/०२/२०२५ला विभागाला दिले त्याची चौकशी करण्याचे आदेश दिले पण याच ठिकाणी आहे.

या ठिकाणी खुलेअम दारू ग्लासने विकली जाते, दादागिरी करुन रात्री बे रात्री, शासकीय सुट्टी, सार्वजनिक सणासुधीला, व महापुरुष्यांच्या जयंतीच्या दिवशी सुद्धा दारू विकली जाते. या ठिकाणी महिलांची छेडछाड केली जाते,घरात घुसलेले,घराच्या समोर उलट्या करत असलेले, महिलांना दारू पिऊन वेडेवाकडे बोलत आसलेले,घरात घुसून पाणी ग्लास मागत असलेले सर्व व्हिडिओ महिलांकडे आहेत असे गणेशनगर,ईश्वर नगर, राजाराम नगर येथील महिलांनी निवेदनात नमुद केले आहे.

छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# थोडक्यात...

## ब्रिटानिया जिम जॅमने मार्व्हल प्रेरित रोमांचक अशी विशेष श्रेणी सादर केली

**छत्रपती संभाजीनगर :** अभेद्य ढाल, बलवान हातोडे, तीक्ष्ण नखे तसेच क्षणार्धात होणारे जलद पुनरागमन यांमुळे मार्व्हल एंटरटेनमेंटचे सुपरहिरो नेहमीच ॲक्शनच्या केंद्रस्थानी राहिले आहेत.या ऊर्जावान विश्र्वाची अनुभूती हाताशी आणत, ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमिटेडच्या जिम जॅम ब्रँडने मार्व्हल-थीमवर आधारित विशेष आवृत्तीच्या पॅकची घोषणा केली असून, या पॅकमध्ये भव्य कथनाक तसेच प्रभावी पात्रांपासून प्रेरित रचना करण्यात आली आहे. ब्रिटानिया जिम जॅम तसेच ब्रिटानिया जिम जॅम पॉप्समध्ये सादर करण्यात आलेल्या नव्या रेंजमध्ये चाहत्यांचे आवडते सुपरहिरो कॅप्टन अमेरिका, थॉर, आयर्न मॅन, डेडपूल तसेच वूल्व्हरिन यांचा समावेश आहे.प्रत्येक पॅकवर वापरण्यात आलेली आकर्षक ग्राफिक्स आणि लक्षवेधी दृश्यरचना यांमुळे ही उत्पादने मार्वल चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहेत.

## क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम चित्रपटाचा प्रीमियर होणार

**छत्रपती संभाजीनगर :** या वर्षाच्या सुरुवातीला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळाले. आता हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज झाला आहे. मराठी झी५ वर २७ फेब्रुवारी २०२६ रोजी या चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित आणि क्षिती जोग व विराज गवस, उर्फी काझमी आणि अजिंक्य धमाल यांची निर्मिती केलेला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा संवेदनशील सामाजिक विषयावरील चित्रपट आहे.

## चंदन लेपपासून बनवलेली अगरबत्ती लाँच केली

**छत्रपती संभाजीनगर :** विप्रो कन्स्युमर केअर अँड लाईटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने अगरबत्ती (धूपबत्ती) क्षेत्रात प्रवेश केला असून, संतूर अगरबत्ती लाँच केली आहे, जी खऱ्या चंदनाच्या लेपाचा वापर करून बनवली आहे. या लाँचद्वारे संतूरने घरातील वातावरण सुगंधित करण्याच्या (होम अँबियन्स) क्षेत्रात आपला विस्तार केला असून, चंदनावर आधारित उत्पादनांशी असलेल्या दीर्घकाळच्या विश्र्वासावर आधारित हा पुढचा टप्पा आहे. संतूर ब्रँड अनेक दशकांपासून आपल्या पर्सनल केअर उत्पादनांमध्ये चंदनाचा वापर करत आले आहे.

## 'जगद्धात्री'चे १०० भाग पूर्ण

**छत्रपती संभाजीनगर :** जगद्धात्री या झी टीव्ही वरील लोकप्रिय मालिकेने नुकतेच १०० भाग पूर्ण करत एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. राहुल कुमार तिवारी निर्मित या मालिकेत स्त्रियांच्या अंतर्गत शक्तीची प्रेरणादायी कथा सादर केली जाते. मुख्य भूमिका साकारणाऱ्या सोनाक्षी बत्रा आणि फर्मान हैदर यांच्यासह संपूर्ण टीमने सेटवर केक कापून हा आनंद साजरा केला. प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे मालिकेची लोकप्रियता अधिक वाढत असून 'हर जनम' या प्रेमगीताला देखील चांगली दाद मिळत आहे. ही मालिका दररोज रात्री १० वाजता प्रसारित होते.

## गोल्डन पीकॉक पुरस्कार २०२५ प्रदान

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी क्षेत्रातील प्रतिष्ठित गोल्डन पीकॉक पुरस्कार २०२५ (जीपीएसीएसआर)प्रदान करण्यात आला आहे. पर्यावरण संरक्षण, समुदाय विकास आणि सर्वसमावेशक वाढ यासाठी कंपनीने सातत्याने केलेल्या वचनबद्ध प्रयत्नांची ही दखल आहे.गोल्डन पीकॉक पुरस्कारांची स्थापना इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्स यांनी केली असून, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी, एचआर उत्कृष्टता आणि नवोन्मेषी व्यवस्थापन पद्धती या क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्याचा गौरव या पुरस्कारांद्वारे केला जातो. हा पुरस्कार चार्ली जेफरी, कुलगुरू आणि अध्यक्ष, यूनिवर्सिटी ऑफ यॉर्क, यूके यांच्या हस्ते मुंबईतील ताज लँड्स एंड येथे आयोजित २०व्या आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी परिषदेत प्रदान करण्यात आला.

## वीवो ने वी७० आणि वी७० एलीट लाँच केले

**पुणे :** वीवो इंडिया ने आज भारतात वीवो वी७० आणि वीवो वी७० एलीट लाँच केले. हे स्मार्टफोन परिष्कृत डिझाइन, शक्तिशाली कामगिरी आणि प्रगत फोटोग्राफीचे परिपूर्ण संयोजन देतात. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे विवो-झीस सह-इंजिनिअर इमेजिंग सिस्टम, ज्यामध्ये ५०चझ नशळी्‌ नाईट टेलिफोटो कॅमेरा आहेछ. हा कॅमेरा नाइस २.० लाईट आणि एआय स्टाईल पोर्ट्रेट तंत्रज्ञानाने परिपूर्ण आहे. यात या सेगमेंटमधील सर्वात मोठा १.३ सेमी सेन्सर देखील आहे, जो कमी प्रकाशातही आश्र्चर्यकारक स्पष्टता आणि बारीक तपशील सुनिश्र्चित करतो. वी७० आणि वी७० एलीट झूम क्लॅरिटीसह ४घ ६० फ्रेम्स प्रति सेकंदाला देखील समर्थन देतात, ज्यामुळे प्रत्येक फ्रेम रंग, खोली आणि तपशीलांनी समृद्ध आहे याची खात्री होते.

# श्री.१००८ वासुपुज्य दिगंबर जैन अतिशय क्षेत्र बाभुळगांव येथे वार्षिक यात्रा भक्तिभावाने संपन्न

## भगवंतांचा महामस्तकाभिषेकाने यात्रेची सांगता






तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० फेब्रुवारी :** श्री १००८ वासुपुज्य दिगंबर जैन अतिशय क्षेत्र बाभुळगांव पिराचे ता.वैजापूर, जि.औरंगाबाद येथे १६फेब्रुवारी सोमवार रोजी सालाबादा प्रमाणे वार्षिक यात्रा महोत्सवाचे आयोजन सिध्दांत चक्रवर्ती आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या आर्शिवादाने करण्यात आले होते. तसेच यावेळी भगवान वासुपुज्य यांचा जन्म कल्याण महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सर्व प्रथम सकाळी ९ वाजता वासुपुज्य भगवानाच्या फोटोची भव्य शोभायात्रा बाभुळगांव गावातुन काढण्यात आली.

या शोभायात्रेत महिलांनी केशरी वस्त्र तर पुरैषांनी सफेद वस्त्र परिधान केले होते. ठिकठिकाणी मिरवणुकीवर भाविकांकडुन व गावकऱ्यांकडुन पुष्पवृष्टी करण्यात येत होती. तसेच ठिकठिकाणी रांगोळयाही काढण्यात आल्या होत्या. तदनंतर शकुंतला शांतीलाल पाटणी सौ.अनिता सुशिलकुमार पाटणी, कविता मनोजकुमार पाटणी, शुभम हितेश उत्कर्ष सी.ए.आदर्श, प्रतिक्षा पाटणी परिवार यांच्या वतीने धर्म ध्वजारोहन करैन यात्रेस सुरैवात करण्यात आली. उपस्थितीत भाविकांना छत्रपती संभाजीनगर येथील श्रीमती.नगीनागबाई बबनलाल, नितीनकुमार, निलेश, रिना, रैतीका, मिताली, ईशान, नियती अजमेरा परिवार, मनोजकुमार सौ. निता तेजल रौनक कासलीवाल परिवार यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला.`

यावेळी सुत्रसंचालन राजाबाजार जैन मंदिराचे माजी सचिव अशोक अजमेरा यानी केले. तर मंगलाचरण रैपाली रावका यांनी केले.यावेळी कार्यकमाची सुरैवात भगवंताच्या फोटोसमोर माल्यार्पन व दिप प्रज्वलन दाना दाता परिवाराकडुन करण्यात आले. यात्रेमध्ये भगवंताचा इंद्र-इंद्राणी बनण्याचे सौभाग्य सौ.किर्ती वर्धमान पाटणी, वर्धमान शिखरचंद पाटणी परिवार यांना मिळाला. तर शांतीमंत्राचा मान सौ.निता प्रकाशचंद बडजाते, नेहा शुभम बडजाते परिवार यांना मिळाला. तसेच जलअभिषेकाचा मान विपीनकुमार निलम उन्नती प्रज्वल पाटणी, इक्शुरसचा मान हेमलता नितीन माणिकचंद चुडीवाल, नारळरस जिनेंद्र दिनेश बाकलीवाल परिवार, आम्ररस शकुंतला देवी शर्मिला मनोजकुमार संगीता कमलकुमार कासलीवाल परिवार, अनाररस नम्रता प्रितेश चंचल अजमेरा, मोसंबीरस दिलीपकुमार शांताबाई रैतिक काजल अजमेरा, दुध अभिषेक सोनाली नितीन चुडीवाल,मोना योगेंद्र पाटणी, दहि अभिषेक सपना ललीत पापडीवाल, रैपकेश किशोर गंगवाल, जितेद्र सुरेंद्र कासलीवाल, शुभम कैलास पाटणी, निरज राजकुमार पाटणी, घी अभिषेक शोभाबाई अमोलकुमार स्मिता मोना पाटणी परिवार यांना मिळाला., सफरचंद रस कुसुमबाई रमेशचंद जितेंद्र महेंद्र सतिश अजमेरा परिवार, सर्व औषधी प्रकाशचंद निता बडजाते परिवार, चतुर्थ कळस पदमाबाई ठोले, सुगंधीत कलश संकेतकुमार निकेतन स्वप्नील आदीस्था पाटणी परिवार, पुष्पवृष्टी दिलीपकुमार राहुल रैषभ कासलीवाल परिवार, मंगल आरती फुलचंद बिसनदास अजमेरा, परिवार आदिंच्या हस्ते भगवंतांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला.

भगवंताचा पाळणा हलविण्याचा मान प्रियंका पारस झांजरी परिवार यांना मिळाला. अर्चना फळ फुलचंदजी अजमेरा यांच्या मुली भगवंतांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला.

यावेळी महावीर सेठी, देवेंद्र काला विनीत लोहाडे मनोज गंगवाल महावीर ठोले शिवुर चे माजी सरपंच नितिन चुडिवाल यांच्यासह भाविकाची उपस्थिती होती यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी दीपचंद अजमेरा शांतीलाल झांझरी प्रकाश अजमेरा दीलीप अजमेरा नरेंद्र अजमेरा पवन झाझंरी किरण अजमेरा भरत अजमेरा पारस झांझरी सतीश अजमेरा रितीक अजमेरा सुनील झंझरी सुभाष अजमेरा सुनील सुंदरलाल अजमेरा संजय अजमेरा बालु अजमेरा आकाश कासलीवाल मनोज कासलीवाल सुनिल पाटणी झुंबर लाल अजमेरा आंनद अजमेरा पारस अजमेरा सुरेश अजमेरा मनोज अजमेरा अनिल अजमेरा नितिन अजमेरा निलेश अजमेरा नंदु अजमेरा धरमचंद अजमेरा राजकुमार अजमेरा धन्नालाल अजमेरा सुनील अजमेरा सुदर्शन अजमेरा विलास अजमेरा अशोक अजमेरा किरण अजमेरा यांनी केले आहे अशी माहीती नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यानी दिली.

## 'राजा शिवाजी' चित्रपटाचे पोस्टर रिलीज

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० फेब्रुवारी :** भारतीय इतिहासातील जाज्वल्यमान नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. स्वराज्य स्थापनेचा तो विलक्षण प्रवास आणि महाराजांचे उत्तुंग व्यक्तिमत्व पुन्हा एकदा एका भव्य स्वरूपात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित, 'राजा शिवाजी' या द्विभाषिक (मराठी आणि हिंदी) चित्रपटाचे अधिकृत पोस्टर आज शिवाजी जयंती दिनी प्रदर्शित करण्यात आले. इतिहास साक्षी आहे त्या अढळ निष्ठेचा आणि अजेय शौर्याचा. एक अशी गाथा, जी केवळ कथा नाही तर आहे 'एक वचन, एक स्वराज्य, एक संपूर्ण राष्ट्राचा अभिमान'.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या पोस्टरमध्ये अभिनेते-दिग्दर्शक रितेश विलासराव देशमुख हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपात अत्यंत प्रभावशाली दिसत आहेत. त्यांच्या हातात फडकणारा भगवा ध्वज, चेहऱ्यावरील करारी भाव आणि युद्धाच्या पार्श्र्वभूमीवर उभे असलेले त्यांचे व्यक्तिमत्व महाराजांच्या शौर्याची प्रचिती देते. पोस्टरमधील सुवर्ण अक्षरातील चित्रपटाचे नाव आणि तेजस्वी प्रकाशयोजना या ऐतिहासिक गाथेच्या भव्यतेची साक्ष देते.

जिओ स्टुडिओज् प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित राजा शिवाजी हा भव्य ऐतिहासिक ॲक्शन-ड्रामा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि दूरदृष्टीला मन:पूर्वक वंदन करणारी सिनेमॅटिक कलाकृती आहे.

# शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य आजही दिशादर्शक : उद्योजक महेंद्र बारगजे

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० फेब्रुवारी :** येथील नाथ स्कूल ऑफ बिझनेस अँड टेक्नॉलॉजी (छडइढ) महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना उद्योजक महेंद्र बारगजे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व्यवस्थापन कौशल्याचा आजच्या आधुनिक उद्योगजगतासाठी मार्गदर्शक ठरणारा वारसा अधोरेखित केला.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते प्रभावी नियोजन, संसाधन व्यवस्थापन आणि रणनीतीमधील अग्रणी नेतृत्व होते. स्वराज्य उभे करताना त्यांनी वापरलेले गनिमी कावा आणि शिस्तबद्ध कार्यपद्धती आजच्या कॉर्पोरेट इकोसिस्टमसाठी दिशादर्शक आहे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महेंद्र बारगजे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. पार्थ घोष आणि ज्येष्ठ शिवचरित्र अभ्यासक ड. शंकर जाधव उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी औरंगजेब यांच्या नजरकैदेतून १७ ऑगस्ट १६६६ रोजी महाराजांनी केलेल्या सुटकेच्या प्रसंगावर आधारित एआय तंत्रज्ञानाचा वापर करून सादर करण्यात आलेले नाट्य सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे संचालक, प्राचार्य तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

## एकनाथ कोलते यांचे निधन

तभा.वृत्तसेवा



**सोयगाव,दि.२० फेब्रुवारी :** आमराई येथील एकनाथ धोंडीबा कोलते (वय.७५) यांचे दि.२० शुक्रवार रोजी सकाळी ८:०० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचेवर संध्याकाळी ०४:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आहे.त्यांच्या पश्र्चात पत्नी,एक मुलगा,दोन मुली,सुन,नातवंडे असा परिवार आहे.सोयगाव शहरातील भैरवनाथ पतसंस्थचे व्हाईस चेअरमन सतीश कोलते यांचे ते वडील होत.

## कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय गुणवत्ता मूल्यांकनात 'अ+' श्रेणीत; तालुक्यातून एकमेव शाळेचा सन्मान




तभा वृत्तसेवा

**कन्नड, दि. २० फेब्रुवारी :** शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्र्वासन आराखडा (SQAAF) अंतर्गत झालेल्या बाह्य मूल्यांकनात कन्नड तालुक्यातील कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय या शाळेस 'अ+' श्रेणी प्राप्त झाली असून, तालुक्यातून ही एकमेव शाळा या मानांकनास पात्र ठरली आहे.

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात राज्यातील एकूण १,०२,६७५ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले होते. त्यापैकी सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या १०,७१२ शाळांची बाह्य मूल्यांकनासाठी निवड करण्यात आली होती. यामधील १०,६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण झाले. त्यातून संपूर्ण राज्यातून केवळ ४२९ शाळांना 'अ+' श्रेणी प्राप्त झाली असून, त्यात कन्नड तालुक्यातून कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयाचा समावेश झाला आहे.

शाळेने शैक्षणिक गुणवत्ता, सांस्कृतिक, कला, क्रीडा, विज्ञान उपक्रम, स्पर्धा परीक्षा, विद्यार्थ्यांचे विविध क्षेत्रातील योगदान, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, भौतिक सुविधा तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे राज्यस्तरावर 'अ+' श्रेणीत निवड झाली आहे.

या यशाबद्दल मुख्याध्यापक रविंद्र पाटील, पर्यवेक्षक गणेश डव्हारे, वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सचिव सागर जाधव, गटशिक्षणाधिकारी मोहम्मद सबाहत , केंद्रप्रमुख बाजीराव ताठे, शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर आदी मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

या यशामुळे कन्नड तालुक्याच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून, विद्यालयाने आपली शैक्षणिक परंपरा अधिक भक्कम केल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

## सोयगाव तालुक्यात अल्पभूधारक कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२० फेब्रुवारी :** तालुक्यातील जरंडी येथील आर्थिक विवंचनेत असलेल्या अल्पभूधारक कर्जबाजारी शेतकऱ्याने राहत्या घरातच गळफास घेत जीवन संपविल्याची खळबळ जनक घटना गुरुवारी (दि.१९) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास घडली गळफास घेतलेल्या शेतकऱ्याने खासगी सावकाराच्या फोन वरील छळ करण्याचे वर्णन चक्क चिठ्ठीत कथित केले आहे.पोलीसांनी ती चिठ्ठी हस्तगत केली



दत्तात्रय रघुनाथ मुठ्ठे(वय.६१) असे चिठ्ठी लिहून घरात गळफास घेतलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्याकडे जरंडी शिवारात दोन एकर शेती आहे शेतीच्या मशागत आणि पेरणीसाठी त्यांनी बँका आणि खासगी सावकारी कर्ज रक्कम असे एकूण पाच लाख रु कर्ज होते, परंतु खासगी सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम फेडण्यासाठी त्यांना वारंवार फोन वर त्रास देण्यात येत होता.त्यामुळे वैतागून गेलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांने गळफास घेतला आहे.घरातील पत्राच्या शेड मध्ये गळफास घेतला दरम्यान घटनेची माहिती मिळताच सोयगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला. मृताच्या खिशात सापडलेली ती चिठ्ठी व मोबाईल पोलीसांनी जप्त केला.सोयगाव ग्रामीण रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन डॉ.शैलेश खंदारे यांनी केले व अंत्यसंस्कार साठी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सायंकाळी पाच वाजता त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्र्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी सुना,नातवंडे असा परिवार आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,उपनिरीक्षक गजानन आरेकर,नारायण जिरी,अजय कोळी,सादीक तडवी,गजानन दांडगे,संजय सिंगल आदी करत आहे.

## भगवती विद्यालय मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सव साजरी



तभा.वृत्तसेवा

**बिडकीन,दि.२० फेब्रुवारी :** आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती भगवती विद्यालय बिडकीन विद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक . रायभान रक्ते यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी छत्रपतींच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारी भाषण केले. रामनाथ धनवे यांनी छत्रपती यांच्या जीवन कार्याचा गौरव करून मार्गदर्शन केले.कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन काळे सर यांनी केले तर आभार जऱ्हाड सर यांनी मानले. याप्रसंगी रामनाथ धनवे, पवार सर, सलगरे किसवे ये. यू, राठोड एस.पी., झारगड ये. जी. यांची उपस्थित होते.

## पोवा कर्व २ आजपासून विक्रीसाठी उपलब्ध आहे.

**नवी दिल्ली :** आजची शक्ती सहनशक्ती, सातत्य आणि दिवस काहीही आला तरी कनेक्टेड राहणे याद्वारे परिभाषित केली जाते. कामाच्या दीर्घ दिवसांपासून ते अविश्र्वसनीय नेटवर्कपर्यंत, दैनंदिन जीवनात अधिक मागणी असते. आणि आता, अखेर प्रतीक्षा संपली आहे.

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. श्रीमती. एम. ए. बेंद्रे ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, ( क. स्तर ) न्यायालय वैजापूर**

सिव्हील एम.ए. क्रं.४३/२०२६

अर्जदार:- देवराव दगडू पवार वय ६५ वर्षे, धंदा - शेती -रा. मु. राजूरा, पो. राहेगांव, ता. वैजापूर जि. औरंगाबाद

मो. नं.८४१२९४७४१४

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

-सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासुर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला की, अर्जदार वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणार आहे. अर्जदाराचे वडील नामे दगडू भिका पवार हे दिनांक १९/०६/१९८९ रोजी वृध्दपकाळाने राहत्या घरी मौजे मु. राजूरा, पो. राहेगांव, ता. वैजापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे मंडाबाई दगडू पवार ह्या देखील बऱ्याच वर्षापुर्वी येथे मयत झालले असून त्यांच्या मयताबाबतचा कोणताही कागदोपीत्र पुरावा अर्जदाराकडे उपलब्ध नसल्यामुळे अर्जदार दाखल करू शकत नाही. तसेच अर्जदाराचे आजी आजोबा बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले असल्यामुळे त्यांच्या मयताबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदारांकडे उपलब्ध नाही. त्यामुळे मयत दगडू भिका पवार यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार असून अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत दगडू भिका पवार यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.आज दिनांक १२/०२/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

प्रकरणात पुढील तारीख २३/०३/२०२६

**कनिष्ठ लिपिक.**

**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर वैजापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती आर.एस. तापडीया साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ५७/२०२६

पुढील तारीख : २०.०३.२०२६

अर्जदार

१-भिमबाई भ्र. गवजी जाधव, वय ८० वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. बिबखेडा पो. जेहूरता. कन्नड, जि. औरंगाबाद छ. संभाजीनगर) २- कु. आरती पिता तात्यासाहेब जाधव, वय १५ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान पालनकर्ती अर्जदार १ भिमबाई गवजी जाधव रा. सदर- आजी ३-संचित पिता तात्यासाहेब जाधव, वय १२, धंदा शिक्षण, अज्ञान पालनकर्ती अर्जदार १ भिमबाई गवजी जाधव रा. सदर-आजी ४ - कु. अनुष्का पिता तात्यासाहेब जाधव, वय ९ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान पालनकर्ती अर्जदार १ भिमबाई गवजी जाधव रा.सदर-आजी

- विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत...

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. म. वि. निंभोरकर, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, मौजे बिवखेडा ता. कन्नड येथील गवजी पिता नामु जाधव हे रहिवाशी व शेतकरी होते, ते सुमारे ३५ वर्षांपूर्वी मयत झालेले आहेत. ते मयत झाले तेव्हा ग्राम पंचायत अस्तीतवात नव्हती, त्यामुळे त्यांचे मयताची नोंदी बाबत कागदपत्र उपलब्ध नाहीत. मयत गवजी यांना अर्जदार क्र.१ नामे भिमबाई ही पत्नी आहे. तसेच मयत गवजी यांना १ मुलगा नामे तात्यासाहेब गवजी जाधव हा होता तो दिनांक ३.१०.२०२१ रोजी मौजे हसनखेडा ता. कन्नड येथे मयत झालेला आहे, तसेच मयत तात्यासाहेब गवनाजी जाधव यांची धर्मपत्नी नामे मंगल तात्यासाहेब जाधव ही दिनांक २८.१२.२०२५ रोजी मौजे बिबखेडा ता. कन्नड येथे मयत झालेली आहे, अर्जदारांनी मुळ अर्जा सोबत दोघांचेही मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. मयत तात्यासाहेब व मंगल यांना एकूण ३ तुले नामे कु. आरती पिता तात्यासाहेब जाधव वय १५ वर्षे, संचीत पिता तात्यासाहेब जाधव वय ११ वर्षे, कु. अनुष्का पिता तात्यासाहेब जाधव वय ९ वर्षे ही मुले तसेच अर्जदार क्र.१ नामे भिमबाई गवजी जाधव ही आई आहे. अर्जदार क्रमांक २ ते ४ ही अज्ञान असल्यामळे त्यांची अज्ञान पालनकर्ती क्रं.१ आजी हिच आहे, अज्ञानांच्या विरोधात तिचे कोणतेही हित संबंध नाही. अर्जदार क्रं. १ ते ४ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाण पत्राची या न्यायालयात अर्जदार यांनी मागणी केली आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी यापूर्वी ईतर कोणत्याही न्यायालयात वारस हक्क प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही, अर्जदार व दोन्ही मयत हे या मा, न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात राहत असल्यामुळे मा. न्यायालयास सदर अर्ज चालविण्याचा अधिकार आहे. अर्जदारांनी दिलेल्या अर्जा सोबत मयत तात्यासाहेब गवजी जाधव, व मंगल भ्र. तात्यासाहेब जाधव यांचे मृत्यु प्रमाणपत्राच्या प्रती व अर्जदार १ ते ४ यांचे आधार कार्ड जोडले आहे. सबब वरील प्रमाणे अर्जदारांनी या न्यायालयात मागणी केली आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक ११/२/२०२६ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक: ११/०२/२०२६

**लिपीक**

**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड**

# दोन दिवसात उखडला नवा सिमेंट रस्ता; दलितवस्ती प्रभाग ८ मधील प्रकार

तभा वृत्तसेवा

**पैठण, दि. २० फेब्रुवारी :** शहरातील दलित वस्ती प्रभाग ८ मध्ये अनेक बोगस कामे झाली असून आता याठिकाणी लाखो रुपये खर्च दाखवत अजित पगारे यांचे घर ते धांडे किराणा असा सिमेंट रस्ता रातोरात उरकण्यात येऊन अवघ्या दोन दिवसातच हा रस्ता उखडल्याने रस्ता तयार करणारी बांधकाम एजन्सी आणि गुत्तेदाराचे पितळ उघडे पडले आहे.



शासनाकडून दलित वस्ती सुधारसाठी येणाऱ्या निधीची वाट लावत प्रभाग क्रमांक ८ भाजी मार्केट परिसरात करण्यात आलेली कामे लोकप्रतिनिधी यांना भोंवली असता आता याठिकाणी अश्याच एका निकृष्ट कामाची तक्रार नागरिकांनी नगर परिषद मुख्याधिकारी डॉ अंभोरे यांच्याकडे केली आहे. आठवड्याभरापूर्वी अजित पागारे यांचे घर ते धांडे किराणा असा सिमेंट रस्त्याचे काम रातोरात उरकण्यात आले. दुसऱ्या दिवसापासूनच या रस्ताची चाळनी सुरु होत. रस्ता जागोजागी उखडला आहे. या बोगस कामाप्रकरणी स्थानिक नागरिकांनी संबंधित एजन्सीचा निषेध करत मुख्याधिकारी डॉ पल्लवी अंभोरे यांना निवेदन देऊन रस्ता पुन्हा करून देण्याची मागणी केली आहे.